cmyk

## संपादकीय

### अवेळीच्या सुरूवातीने धास्ती वाढली

सद्या मे महिन्याचे शेवटचे दिवस सुरू आहेत. उन्हाळी पिकांची काढणी आणि खरीप हंगामाची तयारी असा हा काळ असतो. ऊन मी म्हणत असते आणि वळीवाची एखादी सर सुखावत असते पण यावर्षी सारे उलटे पालटे झाले आहे आणि जे अंदाज, वार्ता येत आहेत, त्यामुळे खरे तर आनंद व्हायला हवा पण या वार्तांनी धडकी भरावी अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्यात गेले आठ दिवस मान्सूनपूर्व पावसाने विजांच्या कडकडाटात बरसायला सुरवात केली आहे, बरसणे हा शब्द अयोग्य ठरावा आणि कोसळणे बरोबर व्हावा अशी स्थिती आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३६ | शुक्रवार, दि.३० मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### भारतात कोरोनाचे १०१० रुग्ण: महाराष्ट्रात ३८३ सक्रिय रुग्णांची नोंद

मुंबईः भारतात कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून,आतापर्यंत एकूण १०१० सक्रिय रुग्ण नोंदवले गेले आहेत. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, १९ ते २६ मे या कालावधीत देशभरात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येने पुन्हा एकदा आरोग्य यंत्रणेला सतर्क केले आहे. राज्यात कोरोनाचे ३८३ सक्रिय रुग्ण आहेत. १९ मे नंतर तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात जानेवारी २०२५ पासून ५२० जणांना कोरोनाची लागण झाली, यापैकी १३२ रुग्ण बरे झाले, अशी माहिती राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिली. दरम्यान, केरळमध्ये सर्वाधिक ४३० सक्रिय रुग्ण नोंदवले गेले आहेत. महाराष्ट्रात २१० सक्रिय रुग्ण आहेत. याशिवाय, दिल्लीत १०४, गुजरातमध्ये ८३, कर्नाटकात ४७ आणि तामिळनाडूत ६९ रुग्ण आढळले आहेत.

# उत्पादन वाढीसाठी एआय वापराचे मॉडेल तयार करा!

## मुख्यमंत्र्यांचे कृषि संशोधकांना आवाहन, संकटात तग धरू शकणारे वाणही विकसित करण्याचे निर्देश

**परभणी । प्रतिनिधी**

**शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला आहे. राज्यातील कृषि विद्यापिठांनी प्रमुख पिकांच्या उत्पन्न वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराचे मॉडेल तयार करण्याबाबत संशोधन करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सोबतच संकटात तग धरू शकणारे वाणही विकसित करण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.**




परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्यावतीने आयोजित संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ५३ व्या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गुरूवारी झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, पालकमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार संजय जाधव, आमदार सतीश चव्हाण, राहुल पाटील, रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर यांच्यासह कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषि आयुक्त सुरज मांढरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठाचे ◀◀ पान २ वर

**संशोधक थेट बांधावर जाणार, महाराष्ट्रातून सुरूवात**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, केंद्र शासनाने राज्यात आयसीआरच्या माध्यमातून सुरु केलेल्या नव्या योजनेत शेतीशी सबंधित विविध शास्त्रज्ञ, या क्षेत्रात कार्यरत संस्था, अधिकारी एकत्रितपणे शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाणार आहेत. संशोधक आणि शेतकरी यांच्यामध्ये या माध्यमातून एक नवीन नाते निर्माण होईल. या अंतर्गत पुढील पंधरा ते वीस दिवस एकात्मिक कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येत असून, या कार्यक्रमाची सुरुवात आपल्या महाराष्ट्रापासून होत आहे ही महत्त्वाची बाब आहे. या माध्यमातून संशोधक एका दिवशी तीन ते चार गावांमध्ये जातील व शेतकऱ्यांशी बांधावर जावून संवाद साधतील. या संवादातून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेती क्षेत्राच्या विकासासाठी हाती घेतलेला हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुखमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**उत्कृष्ट कृषि संशोधन पुरस्कार–२०२५ पुरस्काराने गौरव**

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या उत्कृष्ट कृषि संशोधन शास्त्रज्ञांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाचे डॉ. मदन पेंडके, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे डॉ. संतोष गहुकर, बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठाचे डॉ. विजय दळवी, महात्मा फुले कृषि विद्यापिठाचे डॉ. सुनील कदम यांचा उत्कृष्ट कृषि संशोधन पुरस्कार–२०२५ देवून गौरव करण्यात आला.

**नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाडा दुष्काळमुक्त करणार**

नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरीच्या खोऱ्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी (दि.२९) हिंगोली येथे दिले. जिल्ह्यातील विविध विकास कामांचे भूमीपूजन व लोकार्पण सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. फ्लड डायव्हर्जन प्रकल्प राबविला जाणार असून पुराचे पाणी मराठवाड्यात आणले जाईल. या कामाच्या पुढील महिन्यात निविदा काढल्या जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बीडचा अविनाश साबळे पुन्हा चमकला

### आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये मिळवले गोल्ड मेडल




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी तिसऱ्या दिवशीही केली आहे. दक्षिण कोरियातील गुमी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत धावपटू अविनाश साबळेने ऐतिहासिक कामगिरी बजावली. त्याने भारताला तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले आहे.**

बीड जिल्ह्यातील अविनाश आता आशियाई चॅम्पियन ठरला आहे. त्याने पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. त्याने अंतिम फेरीत ८:२०.९२ सेंकदाची वेळनोंदवताना सुवर्णपदकाला गवसणी घातली. अविनाशने अंतिम शर्यतीत जपानच्या युतारो निनाए आणि कतारच्या झकारिया एलाहलामी यांना मागे टाकत अव्वल क्रमांक पटकावला. जपानच्या युतारोने ८:२४.४१ ◀◀ पान २ वर

## ऑपरेशन सिंदूर अजून संपले नाही – मोदी

**अलीपुरव्दार । वृत्तसंस्था**

**पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा घुसून हल्ला केला आहे. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही, असा कडक इशारा पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी गुरूवार दि. २९ मे रोजी पश्चिम बंगालमधील अलीपुरद्वार येथे दिला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी येथील कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. यावेळी जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानला थेट इशारा दिला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये ◀◀ पान २ वर

## अखेर जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### ६०६ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर आता अधिकारी बदलले

**बीड । प्रतिनिधी**

**काही दिवसांपुर्वी पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्याच्या पोलिस खात्यातील अंमलदार पदा पर्यंतच्या ६०६ कर्मचाऱ्यांच्या एकाचवेळी बदल्या केल्या होत्या. त्याचवेळी पोलिस अधिकाऱ्यांच्याही लवकरच बदल्या होतील, असे संकेत मिळाले होते.**




**अखेर या बदल्या झाल्या असून, अनेक पोलिस अधिकारी जिल्ह्याबाहेर गेले आहेत तर त्यांच्या जागी बाहेरच्या जिल्ह्यातून नवीन अधिकारी येणार आहेत. यामध्ये कालावधी पूर्ण झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.**

बीड जिल्ह्यातून बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये पीएसआय राजेश पाटील ◀◀ पान २ वर

## बीड शहरात पूर परिस्थिती उद्भवू नये यासाठी उपाययोजना करा

### आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी


**बीड । प्रतिनिधी**

**यावर्षी पावसाळ्यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड शहराच्या जवळच असलेले बिंदुसरा धरण जवळपास ८० टक्के भरले आहे. पावसाळपूर्वी अतिवृष्टीमुळेच धरण ८० टक्के भरले आहे तर येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.**



बीड शहरातून बिंदुसरा आणि करपरा या दोन नद्या वाहतात. यावर्षी मान्सूनपूर्व अतिवृष्टी जोरदार झाली आहे. त्यामुळे पावसाळ्याअगोदरच बीड शहरातील दोन्ही नद्यांना पाणी आले आहे. तसेच बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरण प्रकल्पही, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार ८० टक्के क्षमतेने भरले आहे. मान्सूनपूर्व अतिवृष्टीमुळेच ८० टक्के भरलेले धरण आगामी पावसाळा काळात होणारा पाऊस आणि पाण्याची आवक यामुळे साहजिकच ◀◀ पान २ वर

## आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त सरकार बोलवणार संसदेचे विशेष अधिवेशन?



**नवी दिल्ली । वृत्तसंस्थत्त**

आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त चर्चा करण्यासाठी संसदेचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते. केंद्र सरकार २५ आणि २६ जून रोजी विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी प्रयत्न करत आहे. यामध्ये माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीबाबत चर्चा होईल.

या चर्चेच्या निमित्ताने सत्ताधारी पक्ष काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करेल. दुसरीकडे, केंद्र सरकारचा हेतू ओळखून, काँग्रेसने नाराजी ◀◀ पान २ वर

## शेतकऱ्यांना दिलासा! पेरणीची कामे करता येणार

### १२ जून पर्यंत मोठा पाऊस नाही ; हवामान विभागाकडून अंदाज व्यक्त

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बहुतांश भागात पावसाचा जोर ओसरला आहे. कोकण वगळता पुढील ४ दिवस राज्यातील उर्वरित भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाचा जोर वाढल्याने उन्हाळी पिकांचे मोठे नुकसान झाले. तसेच पावसामुळे खरीप पेरणी, शेतीच्या मशागतीचे कामे थांबली आहेत. मात्र आता पावसाचा जोर कमी राहणार असल्याने पेरणीची कामे करता येणार आहेत.




२९ मे पासून १२ जून दरम्यानच्या २ आठवडे कालावधीत कोकण वगळता राज्यातील अंतर्गत भागात पाऊस सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांची शेतीशी संबंधित राहिलेली कामे पूर्ण करण्यास पुरेसा वेळ मिळणार आहे. १२ जूनपासून राज्यात मान्सून परत येण्याची शक्यता आहे, ◀◀ पान २ वर

## आषाढीनिमित्त वारकऱ्यांसाठी सरकारचा घोषणांचा पाऊस

### टोलमाफी, विम्याचा लाभ, नोडल अधिकारीही नेमणार ; एकनाथ शिंदेंची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**आषाढ महिना जवळ येत असल्याने आता पंढरीच्या वारीचे वेध वारकऱ्यांसह शासन आणि प्रशासनलाही लागले आहेत. त्या दृष्टीने सरकारने वारीच्या तयारीला सुरुवात केली आहे. आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.**





आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरूवारी बोलत होते. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे. तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोलमध्ये सवलत दिली जाईल असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गतवर्षी वारीसाठी येणाऱ्या भाविकांना टोलमाफी करण्यात आली होती. त्यामुळे, यंदाही वाहनाने येणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. ◀◀ पान २ वर

**शासन सर्व सहकार्य करणार**

गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल. यंदाची वारी ही स्वच्छ वारी, निर्मल वारी हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.२९ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५२.५० क्विंटल | २,४०० | २,९०१ | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड : १६०.५० क्विंटल | २,००० | २,९०० | २,४२३ |
| मका/लोकल:३३.५०क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : १३.०० क्विंटल | ५,५०० | ६,५०१ | ६,२२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ४०.०० क्विंटल | २,३०० | २,८५० | २,५११ |
| मुग :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन: ३३९.५० क्विंटल | ४,२२५ | ४,३०१ | ४,२५९ |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ५,१०० | ५,३५१ | ५,२२५ |

cmyk

## अग्रलेख

# अवेळीच्या सुरूवातीने धास्ती वाढली

सद्या मे महिन्याचे शेवटचे दिवस सुरू आहेत. उन्हाळी पिकांची काढणी आणि खरीप हंगामाची तयारी असा हा काळ असतो. ऊन मी म्हणत असते आणि वळीवाची एखादी सर सुखावत असते पण यावर्षी सारे उलटे पालटे झाले आहे आणि जे अंदाज, वार्ता येत आहेत, त्यामुळे खरे तर आनंद व्हायला हवा पण या वार्तांनी धडकी भरावी अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्यात गेले आठ दिवस मान्सूनपूर्व पावसाने विजांच्या कडकडाटात बरसायला सुरवात केली आहे, बरसणे हा शब्द अयोग्य ठरावा आणि कोसळणे बरोबर व्हावा अशी स्थिती आहे. त्यामुळे यंदा आक्रित घडले आहे. यंदाचा मे महिना पावसाळी ठरला आहे. पाऊस धुवांधार कोसळत आहे. पाणीटंचाई, टँकर, चारा छावण्या, विक्रमी तापमान, उष्माघात असे विषय मागे टाकत, ढगफुटी, बंधारा फुटला, बाजारपेठेत पाणी शिरले, मका, भुईमुग पिक वाया गेले, केळीची बाग झोपली, रस्ते बंद, छप्पर उडाले, रात्रभर पावसाची बॅटिंग, सूर्यदर्शन नाही, अशा बातम्या येत आहेत.

दुष्काळी मराठवाडा पट्यात आणि कोकण, विदर्भासह बारामती परिसरात या पावसाने धुमाकूळ घातला आहे. भीमाशंकर येथे विक्रमी पर्जन्यवृष्टी झाल्याने भीमेला पूर आला आहे, पंढरपूरचं चंद्रभागेचं वाळवंट आणि तेथील देवालये पाण्यात कोंडली गेली आहेत. हे सारे मे महिन्यात होणे अभूतपूर्व आहे. नेहमीप्रमाणे मुंबईची तुंबई झाली आहे. भूयारी रेल्वेमार्ग अडचणीत आल्याने त्यांची उपयुक्तता स्पष्ट झाली आहे. मान्सून हे भारतीयांसाठी वरदान आहे. मान्सून चांगला बरसला तर भारतीय शेतकरी आणि भारतीय अर्थव्यवस्था चमकून निघते. मात्र राज्यात ढगफुटी, रेड अलर्ट, बंधारे भरले, फुटले असे तांडव सुरू असतानाच आणि पीक वाया गेले म्हणून शेतकरी रडत असताना भारतीय हवामान खात्याने यंदा मान्सून चांगला बरसणार, सरासरी पेक्षा जास्त बरसणार असा अंदाज व्यक्त केला आहे. आनंदवार्ता म्हणून त्यांनी ही घोषणा केली असून जून ते सप्टेंबर या पावसाळी महिन्यांसाठी हा अंदाज व्यक्त झाला आहे. पाऊस चांगला होणार याचा आनंद तर आहेच पण पहिल्या घासालाच खडा लागल्याने हा चांगला पाऊस फायदेशीर ठरणार का? ही भीती मनात दाटली आहे. मे महिन्यातच दुष्काळी भागातील पाझर तलाव तुडुंब भरले अशी घटना शेतकऱ्यांना नवी आहे. शेतात पाणी साठले आहे. विहिरी तुडुंब भरल्या आहेत. कांदा, मका, भुईमूग पीक शिवारात आहे, शेतकऱ्यांना मशागत करायला, पेरायलाही संधी नाही. पीक वाया गेल्याने तोंडचा घास पळवला गेला आहे. जमिनीचे नुकसान झाले आहे. डोक्यावर कर्जाचा बोजा आहे अशा चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी मान्सून सवड न देता धो धो बरसायला लागला तर आणखी कर्जात रुतणार आहे. या शेतकऱ्यांना तातडीने खरीपासाठी मदत आणि नुकसानभरपाई मिळणे गरजेचे आहे. भारताने जपानला मागे टाकले की नाही हे दिसते आहेच. पण क्रमांक कितवा यापेक्षा आनंदी लोकसंख्या किती हे महत्त्वाचे. भारत एकेकाळी सुवर्णभूमी होता, अव्वल होता. पारतंत्र्यात आणि परकीय आक्रमणामुळे तो मागे पडला पण पुन्हा तो सुवर्णकाळ बघेल यात शंका नाही पण या सर्व वाटचालीत भारतीयांचा आनंद निर्देशांक सर्वोत्तम असला पाहिजे. रोजगार वाढला पाहिजे, प्रत्येकाचे उत्पन्न वाढले पाहिजे. अर्थव्यवस्था पातळीवर गुणानूक्रम चांगला, अव्वल असला पाहिजेच पण गुणवत्ता पण अव्वल पाहिजे.

राजकीय घाटावर भ्रष्टाचाराची धुणी भ्रष्टाचारी धुतच राहणार. युवकांनी आता राष्ट्र उभारणीत आणि परीघाबाहेरचा विचार करुन देश वैभवशाली करण्यासाठी, सर्व नागरिक आनंदी होतील अशी कामगिरी करण्यावर भर दिला पाहिजे. सुदैवाने तशी क्षमता भारतीय युवकांकडे आहे व या कामाला मोठी संधी आहे. तूर्त पाऊस चांगला बरसणार सरासरीपेक्षा जास्त बरसणार की नुकसान करणार हे येत्या दिवसात समोर येईलच मात्र याला तोंड द्यायला बळिराजाला बळ द्यावे लागणार आहे.

# अहिल्यादेवी होळकर म्हणजे धैर्य, शौर्य व औदार्याचे मूर्तिमंत स्वरुप-पंकजा मुंडे

## जबलपूर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त कार्यक्रम

जबलपूर । प्रतिनिधी

जीवनामध्ये कितीही कठीण परिस्थिती आणि संघर्ष आला तरीही त्यावर मात करून जनहिताची असंख्य कार्य करणारे महापुरुष हे आपले आदर्श आहेत. धर्मकार्य, संस्कृतीसंरक्षण, निकोप राजसत्ता आणि शौर्य गाजवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या प्रत्येकासाठी प्रेरणास्थान आहेत .आपल्या राजकीय वाटचालीतही त्यांचाच आदर्श घेऊन आपण पुढे जात आहोत. धैर्य, शौर्य व अऔदार्य याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मध्यप्रदेश येथे आयोजित पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती समारोहामध्ये केले.




लोकमाता पुण्यश्लोक राणी अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मध्यप्रदेशातील राणीतल (जबलपूर) येथील भाजप कार्यालयात ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्थानिक भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना ना. पंकजाताईंनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला उजाळा देत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. खासदार आशिष दुबे, महानगर जिल्हा अध्यक्ष रत्नेश कुमार, ग्रामीण जिल्हा अध्यक्ष राजकुमार पटेल, भाजप मध्य प्रदेश कोषाध्यक्ष अखिलेश जैन आदींसह पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. मध्य प्रदेशातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अतिशय उत्साहात पंकजाताई मुंडे यांचे जोरदार स्वागत केले. त्यांच्या भाषणादरम्यानही प्रचंड प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटासह उपस्थितांनी त्यांच्या वक्तृत्वाला दाद दिल्याचे दिसुन आले. यावेळी बोलतांना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या संपूर्ण जीवनचरित्राचा विचार केला तर त्या महाराणी तर होत्याच मात्र आपल्या शौर्याने त्या राजाही बनल्या. केवळ राजसत्ता नव्हे तर संपूर्ण भारतभरात सनातन धर्म, संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी त्यांचे कार्य हे अधोरेखित होते. आपल्या जीवनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श घेऊ आपण वाटचाल करीत आहोत. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्रातून संघर्ष आणि त्या संघर्षावर शौर्याने केलेली मात हा एक मोठा सिद्धांतच शिकायला मिळतो. केवळ राजसत्ता नाही तर एक स्त्री म्हणून ममत्वभावाने त्यांनी प्रजेवर केलेले प्रेम आणि सर्वांनाच आनंददायी राजसत्ता याचा अनुभव त्यांनी दिला. आपल्या धर्मातील अनिष्ट प्रथांना बाजूला सारत आपल्या सनातन संस्कृतीचे महत्त्व ओळखून त्यांनी देशभर अनेक मंदिरांचा जिर्णोद्धार व आपली आध्यात्मिक परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम केलेले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे शौर्य, धैर्य आणि औदार्य याचे मूर्तीमंत स्वरूप असून त्यांचा आदर्श पुढे घेऊन वाटचाल केल्यास जीवनात उन्नती झाल्याशिवाय राहणारच नाही. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या शिकवणीवर आपण वाटचाल करावी असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले. बेडाघाट येथे नर्मदा नदीच्या मध्यभागी असलेल्या मंदिरात अहिल्याबाईंनी स्थापित केलेल्या शिवलिंगाचे ना. पंकजाताईंनी पूजन केले.अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य मोठे आहे. याचाच सार बेडाघाट इथेही दिसून आला. नर्मदा नदीच्या मध्यभागी असलेले हे शिवालय अहिल्यादेवीनीं स्थापन केलेले आहे. त्यांच्या धार्मिक बांधिलकीची साक्ष देणाऱ्या मंदिरात पूजन करून आत्मिक प्रसन्नता लाभली असं त्या म्हणाल्या.

# माऊली विद्यापीठ संचलित, माध्यमिक व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू

**बीड । प्रतिनिधी**

**माऊली विद्यापीठ संचलित ,उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय एमआयडीसी, बीड. येथे विविध अभ्यासक्रमांना(ट्रेड )इयत्ता अकरावी मध्ये ऑफलाइन प्रवेश देणे चालू आहे. या उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात (एच एस सी व्होकेशनल) इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी, एमएलटी, सीओएचएस,ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी, अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट, असे विविध पाच कोर्सेस १९९२ पासून चालू आहेत.**



शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मध्ये वरील अभ्यासक्रमांना इयत्ता अकरावी मध्ये ऑफलाइन प्रवेश देणे चालू आहे. शिष्यवृत्ती ई बी सी सवलत शासकीय नियमाप्रमाणे आहे. हे व्यवसाय अभ्यासक्रम कोर्सेस पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार तसेच मल्टिनॅशनल कंपनीज विविध खाजगी आस्थापना यांच्यामध्ये शिकाऊ उमेदवारी विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. तसेच हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बीए ,बीकॉम ,बीएससी पदवीला प्रवेश मिळतो. तरी दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व पालक यांना वरील अभ्यासक्रमांना आमच्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावा असे आवाहन प्राचार्य मधुकर काळे सर, प्रा. शिवाजी खांडे, प्रा .अनंत इंगळे,प्रा. सतीश स्वामी, प्रा. श्रीमती येलम नंदा, डॉ.मधुकर भिसे यांनी केले आहे.

# महाराष्ट्राला परकीय गुंतवणुकदारांची पहिली पसंती - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राने पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत देश पातळीवर आघाडी घेतली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.**



गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांतच पार झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या ऐतिहासिक आणि विक्रमी गुंतवणुकीवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वाखाली राज्याची प्रगती अशीच सुरू राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# १२७ हेक्टर शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्या

## • तहसीलदारांना प्रहार पक्षाचे निवेदन

जामखेड। प्रतिनिपधी

तालुक्यातील विविध भागात आलेल्या अवेळी व मुसळधार पावसामुळे फळबागा, भाजीपाला, काढणीला आलेला कांदा, टोमॅटो व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सुमारे १२७ हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी आज दिनांक २८ मे २०२५ रोजी प्रहार जनशक्ती पक्ष, जामखेड तालुका यांच्या वतीने तहसीलदार गणेश माळी यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष नय्युमभाई सुभेदार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे, प्रहार पक्षाचे शहराध्यक्ष दिनेश राळेभात, प्रहार शेतकरी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष पंढरीनाथ दौंड, अंकुश वाघ,समाधान जाधव,सागर तादगे,नितीन तादगे,तानाजी पवार, भिमराव पाटील , लहू वाघ, शहाजी वाघ, विलास दौंड, बंडू उगले, सचिन उगले, मोहन भोसले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, जामखेड तालुक्यात अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. पिकांचे, घरांचे व जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने तालुक्यातील शेतकरी संकटात सापडले आहेत. तालुक्याचे संपूर्ण अर्थचक्र कोलमडले असून शासनाने या आपत्तीची तातडीने दखल घ्यावी.शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करून बाधित १२७ हेक्टर शेती क्षेत्राचे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

## पान १ वरून...

### उत्पादन वाढीसाठी एआय वापराचे

कुलगुरू डॉ. संजय भावे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, संशोधक संचालक डॉ. खिजर बेग, डॉ. किशोर शिंदे उपस्थित होते. प्रारंभी स्वर्गीय वसंतराव नाईक, महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. वातावरणीय बदलामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने उभा राहिली आहेत. बदलत्या तंत्राचा वापर करत गुंतवणूक आधारित शेती आपल्याला करावी लागणार आहे. संरक्षित शेतीसाठी शेतीमध्ये गुंतवणूक वाढवावी लागेल. शासनाच्या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून शेतकरी बांधवांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. वातावरणीय बदलामुळे निर्माण होणाऱ्या पावसातील खंड सारख्या संकटात तग धरू शकेल, असे वाण विकसित करावे लागणार आहे. पावसाचा खंड, कीड व्यवस्थापन, वातावरणीय बदलात पावसाचा खंड आदी संकटात तग धरू शकणारे वाण विकसित करण्यासाठी कृषि विद्यापीठांमध्ये संशोधन होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याला कामे करावे लागेल तसेच शेती क्षेत्रात संशोधन करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषि विद्यापीठांनी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला आहे. हा वापर वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठांनी 'मिशन कृत्रिम बुद्धिमत्ता' सुरु करावे. या माध्यमातून प्रमुख पिकांच्या उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे नवे मॉडेल विकसित करावे. यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी राज्यातील चारही कृषि विद्यापिठांच्या स्मरणिका व विविध कृषि विद्यापीठांच्या पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

--------------

### .ऑपरेशन सिंदूर अजून

दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर कृत्यानंतर देशभरात खूप संताप होता. आमच्या माता-बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस केले. पण, आपल्या सैन्याने त्यांना सिंदूरची ताकद दाखवून दिली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जगाला सांगितले की, जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर शत्रूला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा त्यांच्या घरात घुसून हल्ला केला आहे. आम्ही शक्तीची पूजा करतो. आम्ही दहशतवादाचे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती. पाकिस्तानकडे दहशतवादाशिवाय काहीही नाही. पाकिस्तानने फक्त दहशतवादाला पोसले आहे. जेव्हा थेट युद्ध होते, तेव्हा पाकिस्तानचा पराभव निश्चित असतो. हेच कारण आहे की पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांची मदत घेते अशी टीका पंतप्रधानांनी केली.

----------

### बीडचा अविनाश साबळ

सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदक जिंकले, तर कतारच्या झकारियाने ८:२७.१२ सेकंदाची वेळ नोंदवत कांस्य पदकाची कमाई केली. अविनाशच्या नावावर ३००० मीटर स्टीपलटेसमध्ये राष्ट्रीय विक्रमही आहे. तसेच तो आशियाई क्रीडा स्पर्धेतही यापूर्वीच सुवर्णपदक जिंकला आहे. आता त्याने आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्येही सुवर्णपदकाची कमाई करत आशियात त्याचे वर्चस्व सिद्ध केले आहे. अविनाशने यापूर्वी २०१९ मध्ये आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्य पदक जिंकले होते. तो या स्पर्धेत पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदक जिंकणारा तिसरा भारतीय ठरला आहे. यापूर्वी १९७५ साली हरबैल सिंग यांनी सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर १९८९ मध्ये दिना राम यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली होती.

-----------

### शेतकऱ्यांना दिलासा!

अशी माहिती पुणे येथील भारतीय हवामान विभागाच्या हवामान संशोधन आणि सेवा विभागाचे माजी प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, शेतात वापसा झाल्या बरोबर शेतकऱ्यांना पेरणी करता येणार आहे. संबंध राज्यभरात पेरणी करता येईल एवढा पाऊस झालेला आहे. पेरणी उरकल्यानंतर पुन्हा पाऊस येणार असल्याने तो पिकांच्या पथ्यावर पडणारा आहे.

--------------

### आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन

व्यक्त केली आहे आणि त्या काळात संघाची भूमिका पुढे आणण्याचा इशारा दिला आहे. खरे तर, पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर, काँग्रेसने या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी सुरू केली होती. काँग्रेसच्या या मागणीला जवळजवळ सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला. परंतु विरोधकांच्या मागण्या नाकारत सत्ताधारी पक्षाने सर्वपक्षीय बैठक बोलावली. ही बैठक संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तर विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली अशी बैठक घेण्याची मागणी करत होते. दरम्यान, केंद्र सरकारने आणीबाणीसंदर्भात २५ आणि २६ जून रोजी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची तयारी सुरू केली आहे. सरकारच्या या प्रयत्नामुळे काँग्रेस संतापली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस आणि मीडिया प्रभारी जयराम रमेश म्हणाले की, जर असा निर्णय घेतला गेला तर पंतप्रधान मोदींचा तात्काळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्याचा हा आणखी एक मार्ग असू शकतो. जयराम रमेश यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे म्हटले आहे की, २२ एप्रिलच्या रात्रीपासून काँग्रेस पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठकीची मागणी करत आहे. पण अद्याप अशी कोणतीही बैठक बोलावलेली नाही.

------------

### बीड शहरात पूर परिस्थिती उद्‌भवू

आणखी जास्त प्रमाणात भरले जाणार आहे. त्यामुळे बीड शहरातून वाहणार्या बिंदुसरा नदीला पूर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देऊन पूर परिस्थितीबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

**पूल कम बंधाऱ्याच्या कामाची गती वाढविण्याच्या सूचना**

बीड शहरातील बार्शी रोडवरील बिंदुसरा नदीपात्रात पूल कम बंधार्याचे काम सुरू आहे. पाणीपातळीत वाढ होण्याअगोदर हे काम ठराविक स्तराच्या पुढे असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या कामाच्या गती पेक्षा अधिक गतीने हे काम होणे गरजेचे आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.२९) रोजी सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गती वाढविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला केल्या.

--------------

### आषाढीनिमित्त वारकऱ्यांसाठी

गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

----------

### अखेर जिल्ह्यातील पोलीस

छत्रपती संभाजी नगर ग्रामीणला गेले आहेत. रामेश्वर इंगळे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, बसवेश्वर छानशेट्टी धाराशिव, शिवाजी सर्जे धाराशिव, स्वप्निल भुजगुडे धाराशिव, शिला सोमवंशी धाराशिव, निशिगंधा खुळे धाराशिव, प्रमोद यादव छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, राहुल पतंगे धाराशिव, वैभव सारंग छत्रपती संभाजीनगर ग्रामीणला गेले आहेत. तर रमेश घुले धाराशिव वरून बीड, प्रदीप ठूबे बीड, धाराशिव वरून पवन निबाळकर बीडला येणार आहेत. पोलीस निरीक्षकामध्ये बीडवरून संतोष साबळे जालना, प्रशांत महाजन छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, संतोष घोडके जालनाला गेले तर कस्तुरे यांना एक वर्ष मुदतवाढ मिळाली आहे. तर बाहेर जिल्ह्यातून पीआय म्हणून छत्रपती संभाजीनगर वरून किशोर पवार बीड, रमेश जायभाये जालना वरून बीड तर मुरलीधर खोकले छत्रपती संभाजी नगरवरून बीडला आले आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक यामध्ये बीडमधून चंद्रशेखर पवार छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, संतोष मिसळे छत्रपती संभाजी नगर ग्रामीण, विजयसिंग जोनवाल छत्रपती संभाजीनगर ग्रामीणला गेले तर महेंद्र ठाकूर यांना १ वर्ष मुदतवाढ तर महेश क्षीरसागर धाराशिव वरून बीड ला येत आहेत.

दरम्यान, रिक्त झालेल्या ठाणेदारांच्या जागी आता पोलीस अधिक्षक कोणाला संधी देतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. स्थानिक गुन्हे शाखेसारख्या महत्वाच्या ठिकाणीही अधिकारी देणे बाकी असून, पोलीस अधिक्षक यांच्या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान काही ठाणेदारांच्या कारभारावर नाराजी असल्यामुळे त्यांची उचलबांगडी होणार असून, त्यांच्या जागी कोणाला संधी मिळते हे देखील लवकरच स्पष्ट होणार आहे.

-------------

## भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजन –अविनाश जावळे



माजलगाव । प्रतिनिधी

देशाच्या सैनिकांनी युद्धखोर पाकिस्तान ची कुमकुम जिरवली भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाईच्या वतीने आयोजित केलेल्या भारत जिंदाबाद रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की मी प्रथम भारतीय आणि अंतिम ही भारतीय आहे यामुळे देशाचे सार्वभौमत्व महत्त्वाचे आहे भारतीय सैनिकांनी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील अतिरेकीचा तळ उध्वस्त केले देशासाठी लढलेल्या सैनिकाचे मनोबल उंचविण्यासाठी आणि त्यांच्या शौर्य सलाम करण्यासाठी रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले साहेब यांच्या आदेशानुसार व रिपाईचे प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे दि ३० मे रोजी भारत जिंदाबाद रॅली आयोजीत केली आहे ही भारत जिंदाबाद रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत आयोजित केली आहे. भारत जिंदाबाद रॅलीत माजलगाव तालुक्यातील रिपाईच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे वाहन तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे भारत जिंदाबाद रॅली तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी सहभागी होण्यासाठी अविनाश जावळे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ३० मे २०२५

३


# माहिती व जनसंपर्क विभागाने योजनांच्या माहितीची पुस्तिका काढून त्याचे वितरण करावे –एस.एम.देशमुख

**पुणे । प्रतिनिधी**

**''बहुसंख्य पत्रकारांना आपल्या लाभाच्या योजनाची माहिती नसल्याने ते योजनांपासून वंचित राहत होते. त्यामुळे माहिती व जनसंपर्क विभागाने या योजनांच्या माहितीची पुस्तिका काढून त्याचे वितरण करावे'' असे वक्तव्य मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा राज्य अधिस्वीकृती समिती सदस्य एस. एम. देशमुख यांनी केले.**

विभागीय माहिती कार्यालय पुणे आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार भवन येथे माध्यम प्रतिनिधींना पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विकास पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख बोलत होते. यावेळी पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे, स्वप्नील बापट, शरद पाबळे, विभागाचे माहिती उपसंचालक डॉ.किरण मोघे, पुणे सदस्य सुनीत भावे, चंद्रसेन जाधव, पुणे पत्रकार संघाचे खजिनदार शिवाजी शिंदे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव आदी उपस्थित होते. एस. एम. देशमुख म्हणाले, शासकीय योजनांचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी शासनाकडे राज्य अधिस्विकृती समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे. अधिस्वीकृतीसाठी आपण कोणत्या संवर्गात पात्र ठरतो याचा अभ्यास करुन पत्रकारांनी अर्ज केल्यास अधिस्वीकृती मिळण्याची कार्यवाही लवकर होते, असेही ते म्हणाले. पत्रकारांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त असून कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक जिल्ह्यात व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.



पत्रकार सन्मान योजनेंतर्गत प्रति लाभार्थी दरमहा ११ हजार रुपये सन्मान निधी देण्यात येतो. देशात इतकी मोठी रक्कम देणारी योजना राबविणारे इतर कोणतेही राज्य नाही. सन्मान योजनेचा लाभही अधिकाधिक पत्रकारांना मिळावा यादृष्टीनेही प्रयत्न होत आहेत. पत्रकारांनी योजनेची माहिती जाणून घ्यावी आणि अधिकाधिक अर्ज करावेत. त्याचा अधिकाधिक पत्रकारांना लाभ व्हावा यासाठी प्रयत्न व्हावेत, असेही ते म्हणाले. यावेळी देशमुख यांनी अधिस्वीकृतीसाठीचा वरिष्ठ पत्रकार संवर्ग, कोटा पद्धती, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे आदींची माहिती देऊन याबाबत पुणे अधिस्वीकृती समितीकडून चांगला पुढाकार घेतल्याचे नमूद केले.

डॉ. मोघे म्हणाले, माहिती व जनसंपर्क विभागाच्या संकेतस्थळावर पत्रकारांसाठीच्या योजनांची माहिती देण्यात आली आहे. प्रत्यक्ष पत्रकारांशी संवाद साधून त्यांच्यापर्यंत या योजना पोहोचविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विकास पत्रकारिता वास्तवाचा स्वीकार करणे, विश्लेषण करणे, मूल्यांकन करणे आणि सामाजिक जबाबदारी या चार पैलूंवर आधारीत आहे. अशा पत्रकारितेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनातर्फे विकास पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतात. यासोबतच पत्रकारांसाठी शासनाने विविध योजना सुरू केल्या आहेत.

स्व. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीतून विविध आजारांवरील उपचारांसाठी अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना, त्यांच्यावर अवलंबून असणारे पती/पत्नी आणि दोन मुलांनाही १५ हजारापासून ते १ लाख रुपयांपर्यंत मदत मिळते. तसेच केंद्र शासनाच्या पत्रकार कल्याण योजनेअंतर्गतही अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि किमान ५ वर्षे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना अर्थसहाय्य करण्यात येते, अशी माहिती त्यांनी दिली. डॉ.मोघे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि अधिस्विकृती संबंधितच्या नियमावलीचीही माहिती दिली. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. पत्रकारांना योजनांचा लाभ देण्यासाठी माहिती विभागाची नेहमीच सकारात्मक भूमिका राहील, असेही डॉ.मोघे म्हणाले.

पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे म्हणाले, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका आणि अन्य योजनांची माहिती नसल्याने त्यांच्याकडून अर्ज येत नाहीत. मात्र गेल्या दीड वर्षात पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीच्यावतीने पत्रकारांना माहिती देण्यात आल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. त्यामुळे ग्रामीण पत्रकारांना या सुविधेचा लाभ देता आला. अर्जाची काटेकोर तपासणी केली जातेच परंतु अर्जात काही त्रुटी असल्यास समितीकडून त्रुटी दूर होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाते. लवकरच सातारा येथेही अशी कार्यशाळा घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात भावे यांनी पत्रकारांसाठीच्या योजनांची पत्रकारांना माहिती असणे आवश्यक असून त्यासाठी पुणे श्रमिक पत्रकारसंघाने पुढाकार घेऊन कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित पत्रकारांच्या शंकांना उत्तरे देण्यात आली. विविध वृत्तपत्रांचे, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी कार्यशाळेस उपस्थित होते.

## तुळजापूर–लातूर राष्ट्रीय महामार्गांवर पुन्हा अपघात, भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू; १५ ते २० प्रवासी गंभीर

**लातूर । प्रतिनिधी**

**ज्या रस्त्याने माजी आ आर टी देशमुख यांचा बळी घेतला त्या तुळजापूर –लातूर महामार्गावरील आशीव पाटी नजिक आज पहाटे दोन प्रवासी बसचा भीषण अपघात होऊन अपघातामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला असूण १५ ते २० जण गंभीर जखमी झाले आहेत.**



तीन दिवसा पूर्वी तुळजापूर ते लातूर या राष्ट्रीय महामार्ग वरिल बेलकुंड नजिक माजी आ आर टी देशमुख यांच्या फौर्चूनर गाडीचा भीषण अपघात होऊन यात त्यांचा दुर्देवी अनंत झाला असून ही घटना ताजी असतानाच आज पहाटे याच रस्त्यावर बेळकुंड पासून ५ कि मी अंतरावर असलेल्या आशीव पाटी नजिक २ ट्रॅव्हल्स चा भीषण अपघात झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यावरून लातूरकडे जात असलेल्या एका खासगी बसने दुसऱ्या खासगी बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघातात बसमधील दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. १५ ते २० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी लातूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## महास्वराज अभियानाअंतर्गत भटक्या विमुक्त समाजातील १८० जातीचे दाखले वाटप, तहसिलदार संदिप खोमणे यांची माहिती

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियाना अंतर्गत तालुक्यातील हिरापुर याठिकाणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तसेच यामध्ये भटक्या समाजातील नागरिकांना १८० जातीचे दाखले वाटप करण्यात आले असल्याची माहिती गेवराईचे महसुल प्रमुख तहसिलदार संदिप खोमणे यांनी दिली आहे.



याबाबद सविस्तर माहिती अशी की,बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सुचनेवरून हिरापुर याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभीयान तालुका महसुल प्रशासनाच्या वतिने( दि २७ मे) रोजी आयोजित करण्यात आले होते याठिकाणी बीड जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतिने उप विभागीय अधिकारी कविता जाधव,व यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच या शिबीरात भटक्या समाजातील नागरीक देखील उपस्थित होते सदर शिबीराचा लाभ भटक्या विमुक्त समाजातील घटकांना मिळावा यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तसेच यामध्ये भटक्या समाजातील नागरीकांना १८० जातीचे दाखले वाटप करण्यात आले आहे यांचा फायदा त्यांना भविष्यात होईल तसेच शासन या नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही महसूल च्या वतिने देण्यात आली असल्याचे देखील गेवराई महसूल प्रमुख तहसिलदार संदिप खोमणे यांनी सांगितले असून यावेळी मंडळ अधिकारी जगदिश सोळसे,तलाठी आरती सुतार,अनूसया बावनकूळे, सरपंच, उप सरपंच, यांच्यासह भटक्या विमुक्त समाजातील नागरिक उपस्थित होते.

## विजेचा धक्का लागून दोघेजण मयत प्रकरणी जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर



गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील मारफळा शिवारात विजेचा धक्का लागून पिता पुत्राचा जागिच मृत्यू झाला असल्याची घटना ( दि २६ मे ) रोजी घडली होती तसेच सदर ठिकाणी गेवराईचे महसूल प्रमुख यांनी आपल्या पथकासह भेट दिली व या प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर केला असल्याची माहिती मंडळ अधिकारी परमेश्वर सानप यांनी दिली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,गेवराई महसूल मंडळात गेल्या दोन दिवसापासुन सतत अवकाळी पाऊस पडत आहे तसेच गोठाकाठच्या व सर्व शेतकरी बांधव यांच्यासह नागरिकांनी सर्तकता बाळगण्याच्या सुचना प्रशासनाच्या वतिने वेळोवेळी देण्यात येत आहेत तसेच मारफळा याठिकाणी अभिमान लक्ष्मण कबले ( वय ३८ वर्ष ) व ज्ञानेश्वर अभिमान कबले ( वय १९ वर्ष ) दोन्ही राहणार मारफळा तालुका गेवराई जिल्हा बीड हे दोघे पिता पुत्र यांना विद्यूत धक्का लागल्याने जिव गमवावा लागला आहे तसेच सदर ठिकाणी गेवराईचे महसूल प्रमुख तहसिलदार संदिप खोमणे यांनी आपल्या पथकासह भेट देऊन घटनास्तळाचा पंचनामा केला आहे व पिडित कुटूंबियाची भेट घेतली असून सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करण्यात आला असून असल्याची माहिती मंडळ अधिकारी परमेश्वर सानप यांनी दिली असून अवकाळी पावसामुळे होर्णाय़ा हनीपासून नागरिकांनी सतर्क राहून धोका टाळावा व शासनाने सांगितलेल्या सुचनाचे पालन करावे असे अवहान गेवराई महसूल च्या वतिने करण्यात आले आहे.

## चोरट्याने धुमाकूळ घालत वयोवृद्ध पती–पत्नीचा केला खून; महिलेच्या डोक्यात कुकर घातला; वृद्धाला विहिरीत फेकले

**लातूर । प्रतिनिधी**

शेतात राहणाऱ्या वयोवृद्ध दाम्पत्याचा खून करून दागिने लंपास करणाऱ्या केल्याची घटना लातूर जिल्ह्यातील गरसुळी (ता. रेणापूर) येथे घडली असून आरोपीला पोलिसांनी गजाआड केले आहे. गरसुळी येथील रावसाहेब मुकुंद कातळे (वय ६०) व त्यांची पत्नी पुष्पलता रावसाहेब कातळे (५२) हे दोघेही गावालगत असलेल्या स्वत:च्या शेतात राहतात. रावसाहेब यांना अर्धांगवायू असल्याने ते अंथरुणावरच होते. त्यांचा एकुलता एक मुलगा कामानिमित्त हैदराबाद येथे राहतो. दरम्यान, दोघेच वयोवृद्ध राहत असल्याचा अंदाज घेऊन २५ ते २७ मे दरम्यान चोर शेतात आला. तो चोरी करीत असताना पुष्पलता यांनी विरोध केला. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या



डोक्यात कुकर घातला, दगडानेही मारले. हा खून होत असताना अंथरुणावर पडलेले रावसाहेब कातळे यांनी पाहिले. त्यानंतर आरोपीने रावसाहेब यांनाही मारहाण करून उचलून शेताशेजारी असलेल्या काकासाहेब पवार यांच्या विहिरीमध्ये फेकले.

२७ मे रोजी खून उघडकीस

शेताशेजारी पवार यांच्या शेतातील नोकर तण काढण्यासाठी २७ मे रोजी शेतात फिरत असताना विहिरीकडे गेला. त्यावेळी त्याला विहिरीत मृतदेह तरंगताना आढळून आल्याने खुनाचा उलगडा झाला. ओळख पटल्यानंतर कातळे यांचे नातेवाईक माउली विष्णू पवार यांनी पोलिसांत फिर्याद दिली.

पुष्पलता यांची चोरट्याशी झुंज

पुष्पलता यांच्या अंगावरील दागिने चोरण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी विरोध दर्शविला. चोरट्याशी झटापट झाली. घटनास्थळावरील कुकर, दगड आणि पसरलेले साहित्य पाहून नातेवाईक फिर्यादी माउली पवार यांनी खून चोरीच्या उद्देशाने झाल्याची तक्रार दिली. त्यानंतर २७ मे रोजी रात्री उशिरा गुन्हा नोंदविण्यात आला.

चोरीच्या उद्देशाने वयोवृद्ध दाम्पत्याचा खून करणारा आरोपी गावातीलच असल्याचे निष्पन्न झाले. गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर १२ तासांत आरोपी पंडित कोंडिबा रावणकोळे याला अटक करण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सांगितले. आरोपीची चोरीची पार्श्वभूमी असून, यापूर्वी ट्रॅक्टर भरून हरभरा नेऊन त्याने त्याची विक्री केली होती. दरम्यान, पुष्पलता कातळे यांनी आरोपीला 'चोरट्या, माझ्या शेतात का आलास?' असे यापूर्वी म्हटले होते. चारचौघांत चोरीचा आरोप केल्याचा राग मनात धरून हा खून केल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

# सेवानिवृत्त प्राचार्य राऊत सर यांना कृतज्ञतापूर्वक निरोप

### नोकरी केल्यानंतर प्रत्येकाच्या आयुष्यात न टाळता येणारा एक दिवस म्हणजे सेवानिवृत्तीचा. सेवेत असताना एक विचार सतत येत असतो, सेवानिवृत्त झाल्यानंतर काय करावे ?

त्याचे स्वप्ने त्यांनी पाहिलेली असतात. पण नकळत हा दिवस आल्यानंतर अनेकांच्या डोळ्यात पाणी तरळते. आयुष्याची सेकंड इनिंग सुरू झाली. ज्या मित्रांच्या आणि सहकाऱ्यांच्या साथीने तुम्ही तुमचे दिवस घालवले ते दिवस पुन्हा येण्याची संधी आयुष्यात परत मिळणार नसते. म्हणूनच मनावर दगड ठेवून या दिवशी आपण आनंद साजरा करत असतो. पण या दिवशी सोबत काम करणारे सहकारी छोटेखानी सत्कार समारंभ ही आयोजित करतात. घरच्यांकडून मित्रपरिवारांकडून किंवा ग्रामस्थांकडून सत्कार आयोजित केला जातो. असेच आपल्या जवळचे मार्गदर्शक सेवानिवृत्त होणार असतील तर त्यांच्या विषयीच्या आपल्या मनातील भावना त्यांचा आजपर्यंतचा प्रवास जो की आपल्या समोरच झालेला असतो. तो व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही. असेच आमचेही एक जीवा भावाचे दिलदार मार्गदर्शक मित्र प्राचार्य राऊत डी.डी सर हे त्यांच्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नुकतेच सेवानिवृत्त होत आहेत.

राऊत सरांनी अतिशय संघर्षातून १ ली ते ४ थी चे शिक्षण जिल्हा परिषद शाळा मोरवड येथे पूर्ण केले. ५ वी ते १० वी चे शिक्षण जिल्हा परिषद शाळा वडवणी येथे पूर्ण करून १० वी ला शाळेतून, केंद्रातून प्रथम येण्याचा मान त्यांनी मिळवला एकूण ४ पारितोषिकांचे ही ते मानकरी ठरलेले आहेत. १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर ११ वी ते बीएससी पर्यंत शिक्षण त्यांचे गुरु पटवारी सर, डॉ. गुणुकाका चौकिदार, त्यांचे वर्गमीत्र अतुल स्वामी, रतन पवार, पी. आर राऊत, बळीराम नाईकनवरे, बालु कुलकर्णी, या सर्वांच्या सहाय्याने व विशेषात: सरांची मोठी बहिण पुष्पा आक्का, व मेहुने सुंदरराव दळवी यांच्या मदतीमुळे राऊत सरांच्या शिक्षणाला हातभारच लागला नाही तर ते पूर्णत्वाला नेहण्याचे काम केले. शंकर कुलकर्णी सर, पद्माकर पटवारी सर, व आदरणीय प्रा. जनार्दन पटवारी सर यांच्या आशिर्वादामुळेच राऊत सर एका मजुराचा दुर्लक्षीत मुलगा प्राचार्य पदाला गवसणी घालतो हे दिव्यच म्हणावे लागेल. या सर्व महान मोठ्या मनाच्या विचारामुळेच त्यांच्या कटिंग दाड्या करून माजलगाव महाविद्यालय माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले. बीएड प्रशिक्षण शासकीय अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई येथे पूर्ण करून दिनांक ११.६.१९९१ मध्ये संस्कार शिक्षण मंडळ संचलित महाराणी ताराबाई कन्या विद्यालयामध्ये गणिताचे शिक्षक म्हणून त्यांनी दिनांक ३०.६.२००८ पर्यंत सेवा केली. त्यांच्या या कामाचा अनुभव लक्षात घेता संस्कार शिक्षण मंडळाचे कार्यवाह तथा संस्थापक माजी आमदार केशवराव दादा आंधळे यांनी दिनांक ०१.०७.२००८ पासून ते आजतागायत दिनांक ३१.०५.२०२५ पर्यंत महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांच्याकडे पदभार सोपविला.



शिक्षक आणि प्राचार्य हे केवळ पद नसून ते एक कर्तव्य, जबाबदारी आणि दूरदृष्टीचं प्रतीक असतं. आणि जेव्हा एखाद्या प्राचार्याच्या रूपात नेतृत्व, विचारप्रवृत्ती, शिस्त आणि संवेदनशीलता एकत्र पाहायला मिळते, तेव्हा त्या शाळेचा भाग्ययोग उजळतो. आज आपण अशाच एका आदर्श व्यक्तिमत्त्वाचा, प्राचार्य राऊत डी.डी. सरांचा, सेवानिवृत्ती निमित्ताने गौरव करत आहोत.

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडवणी या नामांकित संस्थेचं नेतृत्व करत असताना राऊत सरांनी शाळेचा सर्वांगीण विकास साधला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्याबरोबरच शिक्षकवर्गात एकतेची भावना, कार्यसंस्कृती आणि प्रेरणा निर्माण केली. त्यांची शिस्तबद्ध, पण प्रेमळ कार्यपद्धती, हे त्यांचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य होतं.

राऊत सर हे केवळ व्यवस्थापक नव्हते; ते मार्गदर्शक, संवेदनशील शिक्षक, प्राचार्य आणि अनेक विद्यार्थ्यांचे मनाचे शिल्पकार होते. त्यांनी शाळेतील शिक्षण क्षेत्रात नव्या कल्पनांची अंमलबजावणी करून आधुनिकतेचा स्वीकार केला. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सांस्कृतिक उपक्रम, क्रीडा, आणि नैतिक शिक्षण यावर भर देत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला.

त्यांची कार्यनिष्ठा, स्पष्टवक्तेपणा, आणि वेळेचं भान हे अनेक शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरले आहे. त्यांनी एका शिक्षकाचा आणि प्राचार्याचा दर्जा काय असतो, हे आपल्या वर्तनातून सतत दाखवून दिलं.

राऊत सर आपण ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल मधील विद्यार्थ्यांसाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन केले, ते आपल्याच संकल्पनेतून, तसेच वकृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यी जास्तीत जास्त सहभागी व्हावेत आणि चांगल्यात चांगले वक्तृत्व करावे

यासाठी आपण प्रथम,द्वितीय आणि तृतीय विद्यार्थी येतात त्यांना आपण आपल्या शाळेच्या वतीने बक्षिसे ठेवली. सर खरोखरच आपल्या या अनमोल मार्गदर्शनामुळे आज वडवणी तालुक्यात गुरुकुल चे नाव झाले.

दि.३१मे २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत, तेव्हा त्यांच्या कार्याचा गौरव करणे, हा आमचा सन्मान आहे. त्यांचं योगदान शब्दांत मावणारं नाही, पण त्यांचं स्मरण आमच्या हृदयात सदैव राहील.

राऊत सर, आपल्या पुढील आयुष्यात आपणास उत्तम आरोग्य, शांतता आणि समाधान लाभो, हीच आमची प्रार्थना.

आपल्या प्रेरणादायी कार्यास विनम्र अभिवादन आणि सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मनःपूर्वक शुभेच्छा!

संचालक

--प्रा.व्ही.एस.डोईफोडे(...,.)

ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल वडवणी

# अलमट्टी धरणातून पाणी सोडण्याविषयी मोठा निर्णय

## पूर्व मान्सूनमुळे विसर्ग वाढणार, धरण प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

अलमट्टी धरणातून पाणी सोडण्याविषयी धरण प्रशासनाने मोठा निर्णय घेतला असून कृष्णा आणि घटप्रभा नदीत पूर्व मान्सूनमुळे झालेल्या पावसाने विसर्ग वाढवला जाण्याची शक्यता आहे .यासंबंधी धरण प्रशासनाकडून इशारा देण्यात आला आहे .आज सायंकाळी (२९ मे) पाच वाजल्यापासून अलमट्टी धरणातून नदीपात्रात १० हजार क्युसेक चा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे . हा विसर्ग हळूहळू २०,००० क्युसेकपर्यंत वाढवला जाण्याची शक्यता असून अलमट्टी धरणाच्या प्रवाहात येणाऱ्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय . अलमट्टी धरणातून विसर्ग झाला की कोल्हापूर सांगली या जिल्ह्यांमध्ये संभाव्य पुराची स्थिती निर्माण होते . यासंदर्भात महाराष्ट्र आणि कर्नाटक दोन्ही राज्यांनी समन्वय ठेवत एकत्र येण्याचे प्रयत्न केली असून दरवर्षी पावसाळ्यात तयार होणाऱ्या पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी संबंधित उपाययोजना ठरवण्यासाठी बैठकही घेण्यात आली होती .



धरण प्रशासनाचा अलर्ट

पंचगंगा आणि कृष्णा नदीतील पाण्याची पातळी आणि अलमट्टी धरणातील विसर्ग व्यवस्थापन, अलमट्टी धरणातून होणाऱ्या पाण्याचा विसर्ग कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थिती अशा अनेक बाबींवर या बैठकीत चर्चा करण्यात आली होती .दोन्ही राज्यातील जलस्त्रोत विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन तसेच जिल्हा प्रशासनाने एकत्र येऊन यापूर्वस्थापनावर ठोस उपाययोजना करण्याचे ठरवले . दरम्यान दोन्ही राज्यांच्या मुख्य सचिवांची आज संयुक्त बैठक घेण्यात आली .या बैठकीत कृष्णा नदी कल्लोल मॅरेज आणि घटप्रभा नदीचे लोळसुर ब्रिज या भागात पडत असलेल्या पूर्व मान्सून पावसामुळे आणि त्यातून होणाऱ्या विसर्ग मुळे अलमट्टी धरणात पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता आहे असे धरण प्रशासनाने कळवले आहे .

त्यामुळे २९ मे २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजल्यापासून धरणातून नदीमध्ये दहा हजार क्युसेक विसर्ग सुरू करण्यात येणार आहे .हा विसर्ग हळूहळू २० हजार क्युसेक पर्यंत वाढवला जाण्याची शक्यता आहे .त्यामुळे अलमट्टी धरणाच्या खालील प्रवाहात येणाऱ्या सर्व संबंधितांनी सतर्क रहावे असे धरण प्रशासनाने कळवले आहे . धरणातील पाणी पातळीबाबत कर्नाटक राज्यातील दोन्ही जिल्ह्यांचे प्रतिनिधी वारणा, कोयना धरण व राजापूर बंधाऱ्यावर तर सांगलीचे पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी अलमट्टी धरणाच्या ठिकाणी समन्वय अधिकारी असतील.

## कपाशी -सोयाबीन आधारित आंतरपीक पद्धती

देशातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या जवळपास ४५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. मात्र महाराष्ट्रात हे प्रमाण १८ टक्के आहे. पूर्ण सिंचन क्षमता विकसित केल्यावरही राज्यातील जवळपास ७० टक्के क्षेत्र कोरडवाहू असण्याची शक्यता आहे. अशा स्थितीमध्ये ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट करण्याकरिता कोरडवाहू शेतीच्या विकासावर प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे.वातावरणातील बदलांचा शेती व शेतीशी संबंधित क्षेत्रांवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा काळात पावसावर आधारित (कोरडवाहू) शेती जास्तीत जास्त वातावरणाशी निगडित करावी लागेल.

१. कपाशी + सोयाबीन :

ट्रॅक्टरचलित पेरणी यंत्राच्या साह्याने या आंतरपीक पद्धतीची पेरणी करावी. सर्वप्रथम पेरणी यंत्राच्या सर्व फणातील अंतर ४५ सें.मी. राहील अशी यंत्राची रचना करून घ्यावी. कपाशी पिकाची पेरणी ४५ बाय १५ सें.मी. अंतरावर, तर सोयाबीन पिकाची पेरणी ४५ बाय ५ सें.मी. अंतरावर करावी. पेरणी यंत्राचा वापर करताना पेरणी यंत्र किती पेट्यांचे आहे, हे लक्षात घेऊन पेरणीचे नियोजन करावे. ६ ओळी कपाशीच्या व ६ ओळी सोयाबीनच्या या प्रमाणात पेरण्यात येतील. सोयाबीन पिकाच्या काढणीनंतर सोयाबीनच्या ६ तासांमध्ये असलेल्या जागेमध्ये रब्बी हंगामामध्ये मोहरी या पिकाची ४५ बाय १५ सें.मी. अंतरावर पेरणी करावी.

दुसरे वळण घेतल्यानंतर कपाशीला लागून पुन्हा दोन ओळी कपाशीच्या पेरल्या जातील. याच पद्धतीने पेरत राहिल्यास चार ओळी कपाशीच्या आणि दहा ओळी सोयाबीन पिकाच्या या प्रमाणामध्ये कपाशी + सोयाबीन ४:१० या पद्धतीने पेरणी होत राहील. सोयाबीन पिकाच्या काढणीनंतर दहा तासांमध्ये रब्बी हंगामामध्ये करडई या



पिकाची ४५ बाय २० सें.मी. अंतरावर लागवड करावी.

आंतरपीक व साखळी पीक पद्धतीचे फायदे :

कपाशी समतुल्य विचार केल्यास अधिक उत्पादन व निव्वळ नफा मिळतो. बदलत्या हवामानास अनुकूल, अधिक पाणी वापर कार्यक्षमता व शाश्वत पीक उत्पादन मिळते. सोयाबीन / गवार / चवळी ही द्विदल पिके असल्यामुळे हवेतील नत्र जमिनीत स्थिर होते. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी फायदेशीर. पीक पद्धतीमध्ये कपाशी व सोयाबीन या दोन प्रमुख पिकांचा अंतर्भाव आहे. त्यामुळे एकाच हंगामात दोन्ही पिकांचे शाश्वत उत्पादन मिळण्याची हमी. कपाशी व सोयाबीन हे विविध कालावधीचे पिके असल्याकारणाने हवा, सूर्यप्रकाश, जमिनीतील ओलावा व अन्नद्रव्याकरिता स्पर्धा निर्माण होत नाही. तसेच रोग-किडींचा विपरीत परिणाम पिकांच्या उत्पादनावर होत नाही. सोयाबीन या लवकर परिपक्क होणाऱ्या पिकामुळे रब्बी हंगामात दुबार पीक घेण्याची संधी उपलब्ध होते. सोयाबीन, मोहरी व करडई या तेलवर्गीय पिकांचा समावेश पीक पद्धतींमध्ये आहे. सध्याची देशांतील तेल उत्पादनाची कमतरता भरण्यात आपलाही हातभार लागेल.

## खरिपात मका लागवड जास्त फायदेशीर

पुणे : देशात रब्बी पिकांचा हंगाम संपला आहे. शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. परंतु, देशाच्या बहुतांश भागात मक्याची लागवड केली जाते. मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे. धानाच्या तुलनेत मका लागवडीत शेतकऱ्यांना दुप्पट नफा मिळू शकतो.

देशात वर्षभर मक्याची लागवड केली जाते. पाणी उपलब्ध असताना विविध भागातील शेतकरी वर्षभर शेती करतात. परंतु हे प्रामुख्याने खरीप पीक मानले जाते. खरीप हंगामात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः ज्या राज्यांमध्ये शेतकरी पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहेत, त्या राज्यांमध्ये शेतकरी पावसाळयात वरच्या जमिनीवर मका पिकवतात आणि त्याच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. खरिपातच जास्त मका का घेतला जातो. खरेतर खरीप हंगामात मका लागवड केल्याने हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो.



कमी पावसातही तयार होणारे आणि चांगले उत्पादन देणारे हे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो.

उच्च उत्पादन क्षमता : खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे.

कीड व रोगाचा दाब कमी : भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो.

बाजारातील उच्च मागणी आणि किमती : खरीप मका सामान्यतः रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. पीक रोटेशनचे फायदे: खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत आवर्तनाने पीक घेता येते, जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो.

खरिपातील मका लागवडीचे फायदे : पाण्याची कमी गरज कारण मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते.

## तुरीसोबत योग्य आंतरपिके घेतल्यास मिळेल मोठा फायदा

शेतीतून शाश्वत उत्पादनासाठी आंतरपिके घेणे ही एक चांगली पद्धत आहे. गेल्या दशकापासून हवामानात झालेला बदल, गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, टंचाई यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत आंतरपीक पद्धतीमुळे दुष्काळाची झळ कमी बसते आणि पाऊसमान योग्य असल्यास हेक्टरी अधिक धान्योत्पादन होते. तूर पिकासोबत आंतरपीक घेण्याचे फायदे आणि पद्धती आहेत त्या माहिती करून घेण्याची गरज आहे. अवर्षणप्रवण भागातील कोरडवाहू क्षेत्रात बाजरी, सूर्यफुल, तूर, उडीद, मूग, हुलगा, मटकी इत्यादी महत्त्वाची खरीप पिके आहेत. अति उथळ जमिनीवर सुधारित गवताबरोबर हुलगा किंवा मटकी आणि उथळ जमिनीत बाजरी किंवा सुर्यफूल + तूर (२:१) ओळी या प्रमाणात आंतरपीक पद्धतीची शिफारस केली आहे.

तुरीत आंतरपीक घेण्याचे फायदे : कमी पाण्यात, कमी कालावधीत, कमी उत्पादन खर्चात तूर किंवा तूर + आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास शेतकर्यांना फायदेशीर ठरते. पट्टा पद्धतीत तूर पेरणी केल्यानंतर ओळीतील प्रत्येक तुरीच्या झाडास भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा मिळते,त्यामुळे फुलांचे शेंगांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता वाढते. व उत्पादकतेत वाढ होते. तुरीच्या पिकातून जमिनीवर पडणारा पालापाचोळा यापासून मिळणाऱ्या सेंद्रिय खतामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. एकरी अर्धा टन सेंद्रिय खत जमिनीस मिळते. तूर पिकामुळे पुढील पिकास



एकरी ५० ते ८० किलो नत्र मिळते. तुरीच्या वाढीच्या काळात जमिनीवर पालापाचोळयाच आच्छादन तयार होते त्यामुळे जमिनीवरील ओल्यावर येणाऱ्या लव्हाळा व इतर तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते.

तूर हे कडधान्य पीक असल्यामुळे त्याच्या मुळावरील गाठीत रायझोबियम नावाचे सूक्ष्म जीवाणू असतात ते हवेतील नत्र शोषून जमिनीत गाडतात आणि पुढील पिकास उपलब्ध करून देतात, त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढते.तुरीचे आंतरपीक व्यवस्थापन : पारंपारिक पद्धतीत तुरीच्या दोन ओळीतील अंतर दोन ते अडीच फुट ठेवतात. मात्र त्यामुळे तुरीवरील फवारणी करण्यात अनेक अडचणी येतात. तुरीच्या दोन ओळीत ९० से.मी अंतर आणि १८० से.मी. पट्टा परत पुन्हा ९० से.मी. अंतराच्या तुरीच्या जोडओळी या प्रयोगातून तुरीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच आंतरपिकांचा लाभ मिळवता येईल. तुरीच्या दोन ओळीत जी सरी पडली जाईल, तिच्यात पावसाचे पाणी मुरेल या ओलाव्याचा तुरीला लाभ होईल. तुरीची मुळे जमिनीत खोलवर जातात, त्यामुळे जमीन भुसभुशीत पोकळ होते.

तूर आंतरपीक पद्धती : बाजरी +तूर किंवा सुर्यफुल + तूर - कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर येथे अनेक वर्षांच्या प्रयोगातून बाजरी+ तूर (२:१) किंवा सुर्यफुल+ तूर (२:१) ह्या आंतरपीक पद्धतीमुळे अनुक्रमे ७० आणि ८४ टक्के उत्पादनात वाढ झाली आहे. आंतरपिकातील बाजरी व सूर्यफुलाचा कालावधी ८० ते ९० दिवसाचा असतो. तर तुरीच्या वाणानुसार १२५ ते १६० दिवसांचा राहील. बाजरी अगर सूर्यफुल काढल्यानंतर राहलेल्या कालावधीतील पाऊस, सूर्यप्रकाश,जमिनीतील ओलावा, अन्नद्रव्ये व जागा ह्याचा तुरीच्या वाढीस उपयोग होतो. बाजरी/ सूर्यफुलाची मुळे तंतुमय असल्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील ओलावा, अन्नद्रव्याचे शोषण होते. तर तुरीस सोटमूळ असल्यामुळे जमिनीतील खालच्या थरातील अन्नद्रव्ये व ओलाव्याचे शोषण होते. त्यामुळे ती एकमेकास पूरक ठरतात.

तूर + सोयाबीन - अलीकडच्या काळात तूर + सोयाबीन (१:३ किंवा १:४) पद्धतीने पेरल्यास दोन्ही पिकांचे चांगले उत्पादन येत असल्याचे दिसून आले आहे. सोयाबीनच्या ओळीमध्ये ३० से.मी. तर दोन रोपांमध्ये १० से.मी. अंतर ठेवावे आणि सोयाबीनच्या तीन ओळीनंतर एक ओळ तुरीची पेरावी. तुरीच्या दोन ओळीतील अंतर १२० से.मी. येते. तुरीच्या दोन रोपातील अंतर २० से.मी. ठेवावे. सोयाबीन बियाणे ६० ते ६५ किलो प्रति हेक्टर तर ५ किलो तुरीचे बियाणे प्रति हेक्टरला पुरेसे आहे. बाजरी + तूर अगर सूर्यफुल + तूर या आंतरपीक पद्धतीत बाजरी/सूर्यफुल काढल्यानंतर मशागत करणे महत्त्वाचे असते. कारण मुख्य पीक निघाल्यानंतर, दुसर्या पिकांकरिता ओळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता पीक काढल्याबरोबर कुळव चालवून तण व धसकटे उपटून काढून तेथेच वाळू द्यावीत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४३१: फ्रांसच्या रुआ शहरात जोन ऑफ आर्कला जाळून मृत्यूदंड.
१४९८: इटालियन सागरी खलासी कोलंबस आपल्या सहा जहाजांसोबत अमेरिकेच्या प्रवासाला निघाले.
१५५६: अकबराचा मुलगा सलीम व राणा प्रताप यांच्यामध्ये हळदीघाट येथे घनघोर लढाई झाली.
१५७४: हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा बनला.
१६३५: प्रागचा तह.
१६३१: पहिले फ्रेंच वृत्तपत्र गॅझेट डी फ्रान्सचे प्रकाशन झाले.
१८१४: पॅरिसचा पहिला तह नेपोलियन बोनापार्टला एल्बा येथे हद्दपारीची शिक्षा.
१८६६: मुस्लीम धर्मीय विद्वान मुहम्मद क़ासिम नानोत्वी यांनी उत्तरप्रदेश मधील देवबंद या ठिकाणी आशिया खंडातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या मदरस्याची स्थापना केली.
१९२२: अमेरिकेतील वॉशिंगटन डीसी मध्ये लिंकन यांच्या स्मारकाचा जीर्णोद्धार करण्यात आला.
१९३४: मुंबई नभोवाणी केंद्राची सुरुवात.
१९४२: दुसरे महायुद्ध इंग्लंडच्या १००० विमानांनी जर्मनीतील कोलोन शहरावर तुफानी बॉम्बहल्ला केला.
१९७४: एअरबस ए-३०० विमानांची सेवा सुरू झाली.
१९७५: युरोपियन स्पेस एजंसीची स्थापना झाली.
१९८७: गोवा हे भारतातील २५ वे घटकराज्य मान्य करण्यात आले. गोव्याला भारतातील २६ वे घटक राज्य म्हणून मान्यता मिळाली. ३० मे १९८७ रोजी गोव्याला राज्याचा दर्जा देण्यात आल्याने ३० मे हा दिवस गोवा राज्य स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.
१९९३: पु. ल. देशपांडे यांना त्रिदल' संस्थेच्या वतीने पुण्यभूषण पुरस्कार प्रदान.
१९९८: अफगाणिस्तानमध्ये रिश्टर मापनपद्धतीनुसार ६.६ तीव्रतेचा भूकंप. ५,००० ठार.
२०१२: भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी पाचव्यांदा विश्व बुद्धिबळ पटू होण्याचा मान पटकावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०१०: रेनझाँग, चिनी सम्राट.
१६७२: पीटर द ग्रेट, रशियाचा झार.
१८९४: डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर (इतिहासकार).
१८७९: कॉलिन ब्लाइथ, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५: मॉरिस टेट, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९०६: प्रसिद्ध भारतीय चित्रपट गीतकार, सर्वोत्कृष्ट पटकथा आणि कथा लेखक पंडित मुखराम शर्मा यांचा जन्मदिन.
१९०९: जॉर्ज हेडली (वेस्ट ईंडीझचे क्रिकेट खेळाडू).
१९१६: दीनानाथ दलाल (३० मे १९१६ १५ जानेवारी १९७१)दीनानाथ दलाल हे वाङ्मयीन पुस्तकांतील बोधचित्रांकरता, मुखपृष्ठांकरता ख्यातनाम झालेले मराठी चित्रकार होते. यांचे मूळ नाव नृसिंह दामोदर दलाल-नाईक होते परंतु पुढे दीनानाथ दलाल या नावाने ते प्रसिद्धीस आले.
१९४०: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष तसचं, बंगाल क्रिकेट असोसिएशन चे माजी अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे माजी अध्यक्ष जगमोहन दालमिया यांचा जन्मदिन.
१९४९: इंग्लिश जलदगती गोलंदाज बॉब विलीस यांचा जन्म.
१९५०: परेश रावल (भारतीय अभिनेते).
१९५२: भारतीय औषध शास्त्रज्ञ, संगीतशास्त्रज्ञ, हार्मोनियम वादक आणि ज्योतिषशास्त्र सल्लागार विद्याधर ओक यांचा जन्मदिन.
**१९५५:** प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते, विनोदकार आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभेचे माजी सदस्य परेश रावल यांचा जन्मदिन.
१९५६: भारतीय वंशीय अमेरिकन जैविक अभियंता, साहित्य वैज्ञानिक आणि शैक्षणिक प्रशासक सुब्रा सुरेश यांचा जन्मदिन.
१९६४: भारतीय सेवानिवृत्त क्रिकेट पंच के. एन. राघवन यांचा जन्मदिन.
१९८०: देवेन्द्र बार्नहार्ट (अमेरिकन संगीतकार).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१४: नेपोलियन बोनापार्ट यांची पहिली पत्नी जोसेफिन डी बीअर्नार्नास यांचे निधन. (जन्म: २३ जून १७६३)
१८२९: विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १७७८)
१८९२: बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८१७ तेहरान, इराण)
१९३३: भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार आणि संघटन कर्ता लोकराम नयनराम शर्मा यांचे निधन.
१९५४: व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कार प्राप्त ब्रिटीश सैन्य दलाचे थोर सैनिक फ्रेडरिक विल्यम हेजेस यांचे निधन.
१९७१: प्रख्यात भारतीय चित्रपट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे निधन.
१९७२: पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटअभिनेता. (जन्म: ३ नोव्हेंबर १९०१)
१९७७: भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी यांचे निधन (भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक) (जन्म: २६ नोव्हेंबर १८९०)
१९८७: चौधरी चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक, भारताचे ५ वे पंतप्रधान. (जन्म: २३ डिसेंबर १९०२)
२००७: महाराष्ट्र राज्य लता मंगेशकर पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हिंदी व मराठी चित्रपट संगीतकार स्नेहल भटकर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९१९)
२०१०: समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)
२०२०: अजित जोगी (छत्तीसगढचे पहिले मुख्यमंत्री).

## थोडक्यात



### अभिनेता डॉ.महेश वनवे मातृभूमी कडून सत्कारीत

बीड । प्रतिनिधी

वामा लढाई सन्मानाची या चित्रपटास नुकताच१० पैकी ९.८ एवढी सर्वोच्च रेटिंग मिळाल्याबद्दल तसेच चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयाबद्दल अभिनेता डॉ.महेश कुमार वनवे यांना मातृभूमी प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने ह भ प मोहन महाराज खरमाटे व प्राचार्य डी जी तांदळे यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन दि.२८ मे २०२५ रोजी मातृभूमी प्रतिष्ठान कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ संजय तांदळे, राम वनवे ,पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ ,बाबासाहेब जायभाये , लक्ष्मण चाटे , बी पी जायभाये,बाजीराव ढाकणे आदींची उपस्थिती होती.


### सोमवारी २ जून रोजी लोकशाही दिन

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक २ जून २०२५ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल जिल्हा लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्ज सर्व संबधित विभागाकडे वेळीच पाठविण्यात आलेले आहेत. सदर अर्जासह अथवा नवीन अर्जासह अर्जदार जिल्हा लोकशाही दिनाच्या दिवशी उपस्थित राहणार आहेत.

### भीमराव सानप यांचे निधन

फुलसांगवी: येथील श्री. संत वामनभाऊ महाराज मंदिर ट्रस्ट समितीचे सचिव भीमराव देवराव सानप (८०) यांचे मंगळवार दि.२७ मे रोजी सायं ७ वाजता दुःखद निधन झाले असून त्याच्यावर मंगळवार दि.२८ मे रोजी नातलग,



सगे सोयरे, गावकरी यांच्या उपस्थिती शोकाकुल वातावरणामध्ये अंत्य संस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी इंदुबाई भीमराव सानप, मुलगा दिलीप भीमराव सानप, व सौ.विजया शिवाजी गर्जे, सौ. जयश्री बद्रीनाथ विघ्ने, या मुलीसह सून,नातवंडे, असा मोठा परिवार आहे. भीमराव गुरुजी सानप यांनी ट्रस्ट समितीच्या सचिव पदावरून श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचा गेली अनेक वर्षांपासून कारभार पहिला होता. यामुळे ट्रस्ट समितीत गुरुजीच्या निमित्ताने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना महिनाभरात मदत मिळणार

## जिल्हाधिकारी महिन्यातून दोन वेळा बैठका घेणार

बीड । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकाचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते.बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत दिली जाणारी १ लक्ष रुपये मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने कुटुंबांची परवड होत होती.

त्यामुळे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या हाती असणारे उपमुख्यमंत्री वित्त मंत्री तथा नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''अजितदादांच्या विकासाचे गाजरवाटप''आंदोलन करण्यात आले होते. या अनुषंगाने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याची दखल घेत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना शासकीय मदत देण्याच्या हेडवर निधी उपलब्ध नसल्यास ईतर हेडमधुन तो निधी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्याचे निर्देश पालकमंत्री बीड यांनी जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन यांना दिल्याची माहिती काल दि.२८ बुधवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत दिली.

### पालकमंत्री अजितदादाकडून आंदोलनाची दखल :डॉ.गणेश ढवळे



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन स्वतः शेतकरी आत्महत्येचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातुन दोन बैठका घेणार असुन तालुकास्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसांत जिल्हा समितीकडे पाठवावे असुन याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसात पूर्ण केली जाणार असल्याने महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी बैठकीत दिली. बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील पात्र ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तातडीने निधी देण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे व त्यांचे सहकारी शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे,शेख मुस्ताक, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''अजितदादांचे विकासाचे गाजर वाटप'' लक्ष्यवेधी आंदोलन करत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदतनिधीची पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तरतूद करावी अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री बीड अजितदादा यांनी जिल्हाधिकारी बीड यांना आदेश दिले आहेत.

## कर्जबाजारी झालेल्या कुटुंबावर उपासमारीची वेळ

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरासह तालुक्यातही खाजगी सावकारकीचे पेव फुटले आहे जुना नेम बाह्य कर्ज देऊन त्यावर शेकडा दहा ते पंधरा टक्के व्याजदर आकारून व्याजाला व्याजा करून कर्जाचा डोंगर उभा केला जातो अशा परिस्थितीत कर्ज नफीडू शकल्याने कुटुंब उद्ध्वस्त होत चालले आहेत कुटुंब मानसिक दबाव खाली ताणतणावाखाली येत असून खाजगी सावकार गर्जना फेडल्यामुळे शिवीगाळ दमराठी जमीन बळकवण्याची धमकी देत आहे असे प्रकार सरस्वत असताना सहाय्यक निबंध सहकारी संस्था पोलीस प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करत आहे अशाने खाजगी सावकारकीच्या घटना घडत चालले आहे यातच गुन्हेगारीच्या घटना सुद्धा जास्त प्रमाणात घडून येत आहेत सावकाराच्या आवाजासह व्याजदरामुळे शेतकऱ्याला शेत जमीन गहाण ठेवून ही कर्ज भेटत नसल्यामुळे आत्महत्या करण्याची वेळच आहे जास्त पैसा कमावण्याच्या नादात तरुण आज काल सावकार कडे सावकार कडे ओळत चालू आहे विशेष म्हणजे गुंड प्रवृत्तीच्या तरुणांनी आपली स्वतःची टीम तयार करून कर्ज वसुलीच्या कामाला लावले आहे गरजवंत लोक ओळखून शेतकरी मुलांचे शिक्षण दवाखाना या गरजेपोटी खाजगी सावकार करून पैसे घेत असून शेतकरी कर्ज घेत असून शकल्याने आत्महत्याकडे वळत आहे सरकारी बँक करीत असताना पर्याय नसल्याने शेतकरी खाजगी सावकार सावकार कडे वळत आहे त्यातूनच कुटुंब उद्ध्वस्त होत चालली आहे खाजगी सावकार स्वतःच्या मनमानीने कर्ज वसुली करण्यामुळे लोक शेती घर घाण ठेवून आत्महत्या करत आहेत शासनाने वेळेच्या कडे लक्ष देण्याची गरज आहे

### गुंड प्रवृत्तीमुळे तक्रार देण्यास कुणी दजावत नाही

पाटोदा शहर व शहर परिसरात १०० पेक्षा अधिक खाजगी सावकार आहेत खाजगी सावकार हे एक लाखासाठी प्रतिदिन एक हजार रुपये व्याजा करत आहेत आता आम्ही खाजगी सावकाराविरुद्ध आवाज उठवणार आहोत खाजगी सावकारविरुद्ध माहिती आम्ही निबंध कार्याला देणार आहोत प्रशासनाने खाजगी सावकार लाविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी विधीतज्ञ व सामाजिक कार्यकर्ते अँड जब्बार पठाण करत आहेत

## खडकवाडी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी अमरण उपोषण



पाटोदा । प्रतिनिधी

खडकवाडी ग्रामपंचायतीतील सरपंच व ग्रामसेवक यांनी सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याच्या गंभीर आरोपांमुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव लोंढे यांनी पाटोदा पंचायत समिती कार्यालयासमोर अमरण उपोषणास गुरुवार, दिनांक २९ मे २०२५ पासून सुरुवात केली आहे.

या उपोषणाला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा लाभत असून,उपोषणस्थळी घोषणाबाजी करत ग्रामपंचायतीतील आर्थिक अपहार, बोगस ठराव, योजनांचा गैरवापर आणि लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याच्या घटना उघड केल्या जात आहेत.उपोषणामागील प्रमुख मागण्या:सरपंच अपात्र ठरवून कारवाई करावी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६(१४)(अ) अंतर्गत कारवाई करावी.ग्रामपंचायत खडकवाडी दलित वस्तीमध्ये काम न करता सरपंच व ग्रामसेवक यांनी अपहर केलेल्या ४,३६,४९१/- रकमेची वसुली करावी.ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तिक शौचालय अनुदान तात्काळ लाभार्थ्यांना वितरित करावे.ग्रामसभा व मासिक सभा न घेता बोगस ठराव करून नरेगा अंतर्गत सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉकच्या कामांची कुशल बील ऑनलाईन न केल्याबद्दल चौकशी करावी.प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेतील प्रस्ताव सरपंच व ग्रामसेवक यांनी सादर न केल्यामुळे लाभार्थ्यांवर झालेला अन्याय दूर करावा. ज्ञानदेव लोंढे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''जोपर्यंत चौकशी सुरू होत नाही आणि दोषींवर गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत हे उपोषण मागे घेण्यात येणार नाही.'' प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष या प्रकरणामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून, ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे. आंदोलनकर्त्यांनी मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

## गर्भवती हरिणीवर कुत्र्यांचा हल्ला;वाचविण्याचे प्रयत्न निष्फळ

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकरी प्रजित प्रताप भोंडवे यांच्या शेतातील घरामागे सकाळी ७ वाजता कुत्र्यांच्या भुंकण्याचा गोंगाट ऐकु आला. प्रताप व प्रजित बापलेकांनी धाव घेतली असता त्याठिकाणी हरणांवर कुत्र्यांचा कळप हल्ला चढवताना दिसला.त्यांनी कुत्र्यांच्या तावडीतून हरणाची सुटका करत तिला पाणी पाजले आणि डॉ.गणेश ढवळे यांच्या घरी बैलगाडीत टाकुन आणले. डॉ.गणेश ढवळे यांनी लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांना बोलावून घेतले.



वनविभागाचे कर्मचारी यांना फोनवरून कल्पना दिली. डॉ.अर्जुन पवार, परिचर सुधाकर देशमुख यांनी गर्भवती हरणीवर उपचार करून वाचवण्याचे प्रयत्न केले परंतु कुत्र्यांनी हरणीच्या मानेवर व ईतर ठिकाणी गंभीर चावे घेतल्यामुळे हरिणीने प्राण सोडले. वनविभागाचे कर्मचारी वनरक्षक महेश मेटे , वनकर्मचारी अनिल शेळके, गौतम वीर, हनुमंत वायभट, मधुकर वायभट वनविभागाची गाडी घेऊन लिंबागणेश येथे पोहोचले. हरिणीला त्यांच्या ताब्यात दिले. गर्भवती हरिणी असल्याने लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पोस्टमार्टेम करून हरीणीच्या गर्भातील पाडसाला वाचवण्याचा प्रयत्न डॉ.अर्जुन पवार व परीचर सुधाकर वैद्य यांनी केला परंतु दुर्दैवाने मृतावस्थेत आढळून आले. मृत हरणीचे शरीर वनविभाग कर्मचाऱ्यांच्या हवाली करण्यात आले. गर्भवती हरिणीला वाचविण्यात शेतकरी पुत्र प्रजित भोंडवे आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अर्जुन पवार यांचे निकराचे प्रयत्न निष्फळ ठरले


## खोलेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड
(रजि. बीएचआर / बीएचआर/आरएसआर/सीआर/१५/८/२०२२)

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

पतसंस्थेची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. १८/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता मुख्यकार्यालय 'माऊली कॉम्प्लेक्स दिगुड ता. माजलगाव जि. बीड येथे आयोजित केली आहे.

सभेपुढील विषय

१) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१ मार्च २०२५ अखेरच्या वर्षांचा अहवाल, ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजूर करणे
२) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देणे.
३) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे
४) आर्थिक वर्ष२०२५-२०२६ करिता वैधानिक लेखापरीक्षकाचे नियुक्ती आणि त्यांचे मानधन निश्चित करणे.
५) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) पतसंस्थेच्या दीर्घकालीन व्यवसायवाढीच्या उदिष्टास मान्यता देणे.
७) संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या नविन सभासद अर्जाला मान्यता देणे.
८) संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या राजीनामा अर्जाला मान्यता देणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०) मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर निर्णय घेणे.

**नोंदणीकृत कार्यालय**
**खोलेश्वर नागरी सहकारी पतसंस्था**
**मर्यादित, दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड-४३११२८**
**दिनांक : २९.०५.२०२५**

**मा. संचालक मंडळाच्या**
**आदेशावरून स्वाक्षरीत**
**पारेकर आर.डी.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सूचना :** सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी ११:०० वाजेपर्यंत पूर्ण झाली नाही तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकललेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११:३० वाजता मूळ विषय पत्रिके वरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदास महत्वाच्या सूचना**

१) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/सूचना मंडावयाच्या असतील तर त्यांनी त्या दि.१५.०६.२०२५ पर्यंत कामकाजाच्या वेळेत, नोंदणीकृत कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात.
२) ज्या सभासदांना नाव, पत्ता अथवा वारस नोंद बद्दल करावयाच्या असल्यास पतसंस्थेच्या नोंदणीकृत कार्यालयातील शेअर्स विभागात नोंद करून घ्यावी.
३) सभेची नोटीस पतसंस्थेच्या मुख्य कार्यालय व शाखा नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.


## भाटवडगाव ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार, मूळ खरेदीखत केले गहाळ

### ग्रामसेवकावर कारवाई करा: सार्वजनिक रस्ता अडवल्याचे प्रकरण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १३८ मधील सार्वजनिक रस्ता अडवल्याप्रकरणी ग्रामपंचायतने मूळ खरेदी खत व एन ए ले आऊट गहाळ केले असल्याचे समजते या प्रकरणी संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी उपोषणकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी केली आहे



याविषयी सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत गट नंबर १३८ मधील मुख्य रस्ता अडविल्याप्रकरणी गेले तीन महिन्यापासून या भागातील ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे हे आंदोलन करीत आहेत हा रस्ता पूर्व चालू करून द्या या मागणीसाठी त्यांनी दि ०३ एप्रिलला पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण केले, तर दि २४ मार्चला पंचायत समिती कडे रस्ता पूर्व चालू करून देण्याची मागणी केली आहे.या अनुषंगाने पंचायत समितीने विस्तार अधिकारी राजेंद्र पारडकर यांना चौकशी अधिकारी नेमले परंतु ग्रामपंचायतचे कार्यरत ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांचाच सार्वजनिक रस्तावर पत्र्याचे शेड उभारुन रस्ता अडविण्यात ग्रामसेवक यांचाच हात असल्याने ग्रामपंचायत मधील मूळ खरेदी खत व एन ए लेआऊट व इतर कागदपत्रे गहाळ केल्याचे समजते. ग्रामसेवक चौकशी अधिकारी यांना चौकशी कामे कोणतेच कागदपत्र देत नसल्याने सार्वजनिक रस्ता पूर्ववत करण्यास अडथळा निर्माण होत आहे.तसा अहवाल चौकशी अधिकारी राजेंद्र पारडकर यांनी ०८ मे रोजी गटविकास अधिकारी माजलगाव यांना दिला असल्याचे समजते,यावरून भाटवडगाव ग्रामपंचायत कार्यालयाचा भोंगळ कारभार व ग्रामसेवक साहेबराव चव्हाण यांचा निष्काळजीपणा दिसून येत असल्याने सदरील ग्रामपंचायत व ग्रामसेवकावर कारवाई करावी अशी मागणी उपोषण शकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे यांच्यासह या भागातील रहिवासी यांनी केली असून गटविकास अधिकारी यांनी हा सार्वजनिक रस्ता रहदारीस पुर्ववत चालू करून द्यावा अशी मागणी होत आहे नसता जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे

## रामदास कुंभार यांची महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुखपदी निवड



बीड । प्रतिनिधी

आळंदी येथे अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ दिल्ली. या राष्ट्रीय महासंघांचा मेळावा सोमवार २६ मे रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी रामदास कुंभार यांची महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. या मेळाव्यासाठी देशातील सर्व राज्यातून मोठ्या संख्येने कुंभार समाज बांधव उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यातील केज येथील रहिवाशी असलेले रामदास अंबादास कुंभार सर यांची महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष प्रजापती यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन रामदास कुंभार यांना पुढील पाच वर्ष समाजाच्या हितासाठी संस्थेच्या हितासाठी काम करण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी दत्ता ढालजकर, रंगनाथ सूर्यवंशी, सोमनाथ सोनवणे, संतोष पाषाणकर, शशिकला कुंभार, चनबस वायकर, सावंदे, मनोहर जाधव, अर्जुन दळे, महादेव खटावकर यांच्यासह राज्यभरातून कुंभार समजा बांधव उपस्थित होता. रामदास कुंभार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कामात ग्रामस्थांची अडवणूक

## गावकऱ्यांनी आणला सरपंचावर अविश्वास ठराव

**अर्जुन मुंडे । वडवणी**

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील सरपंचांना कामात होत असलेल्या अनियमितता,तसेच वारंवार कामकाजात मुलाचा होत असलेला हस्तक्षेप कामात नागरिकांची केली जात असलेली अडवणूक यामुळे गावकऱ्यांनी अविश्वास ठराव एकमताने पारित करत सरपंच सौ. प्रभावती लक्ष्मण हतागळे यांच्या विरुद्ध ३४९ /२ यांच्यावर अविश्वास ठराव आणत पदावरून हटवले आहे. २०२२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूकी मध्ये काडीवडगाव येथील जनतेने जनतेमधूनच सौ. प्रभावती हतागळे यांना निवडून दिले होते.सरपंच यांच्याकडून गावकऱ्यांना विकास कामाच्या मोठ्या अपेक्षा होत्या.परंतु सरपंच हे विकास कामातच



अडकाठी आणू लागले. लाभार्थ्यांची आडवणूक करू लागले तसेच सरपंच यांचा मुलगा वारंवार कामात हस्तक्षेप करु लागला यामुळे काडीवडगाव येथील आठ ग्रामपंचायत सदस्य यांनी एकत्र येत दिनांक ३० एप्रिल रोजी सरपंच यांच्याविरुद्ध वडवणी तहसील मध्ये अविश्वास ठराव पारित केला होता.यानंतर याची सुनावणी जिल्हाधिकारी यांनी घेत दिनांक २७ मे रोजी श्रीगणती करत विशेष ग्रामसभा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.या सूचनेनुसार दिनांक २७ मे रोजी

**वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील प्रकार, ३४९/२ अविश्वास ठराव पारित**

काडीवडगाव येथे वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा घेण्यात आली यावेळी गावातील नागरिकांनी सरपंच यांच्यावरील अविश्वासावर च्या ठरावावर जनमत घेण्यात आले यावेळी ३६५ नागरिक उपस्थित होते यातील ३४९ नागरिकांनी सरपंच यांच्या विरोधात तर २ नागरिकांनी सरपंच यांच्या बाजूने जनमत दिले तर १४ नागरिक तटस्थ राहिले.३४९/२ असा ठराव पारीत करण्यात आला.यावेळी गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, विस्तार अधिकारी तलाठी ग्रामसेवक व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# अंबाजोगाई बसस्थानकात बसखाली येऊन तरूणाचा मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई बस स्थानकाच्या प्रवेशद्वारावर गुरूवार, दिनांक २९ मे रोजी सकाळच्या सुमारास एक दुर्दैवी अपघात घडला. (एमएच-१४, एमएच-१७०१) या क्रमांकाच्या एस.टी.बसच्या खाली येऊन एक तरूण चिरडला गेला. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला.

मयत तरूणाचे नांव अंकुश मोरे रा.धानोरा (बु.), ता.अंबाजोगाई असे आहे. स्थानकाच्या पश्चिम प्रवेशद्वाराने आत मध्ये प्रवेश करीत असताना सदरील बसने अंकुश यांस चिरडले. अपघातानंतर अंकुश यांस गंभीर अवस्थेत स्वाराती रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, रूग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती मिळाली आहे. या





प्रकरणी पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करीत आहेत.

# वीज मंडळाने आपला कारभार सुधारून ग्राहकांना चांगली सेवा द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार -डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

सध्या अंबाजोगाई शहरात वीज विभागाच्या गलथा न कारभारामुळे सर्वसामान्य जनतेला, व्यापारी वर्गाला तसेच वैद्यकीय आस्थापनांना विनाकारण नाहक त्रास होत आहे. वीज विभागाच्या अनियमित सेवेमुळे लाईट कधी येईल आणि कधी जाईल याचे कसलेही अंदाज कुणालाच लावता येत नाहीत. त्यामुळे अंबाजोगाई शहर येथील नागरिक ,व्यापारी वर्ग ,डॉक्टर वर्ग त्रस्त झाल्याचे चित्र सगळीकडे पाहायला मिळत आहे.

वीज विभागाच्या या अनागोंदी कारभारामुळे सोशल मीडियावर अनेकजण ही नाराजी व्यक्त करून दाखवत आहेत. परंतु मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधावी यामुळे सर्वजण शांत आहे मात्र याप्रकरणी



अंबाजोगाईचे माजी शिक्षण सभापती डॉ राजेश इंगोले यांनी लवकरच वीज विभागाच्या अधिकाऱ्यांना जनतेच्या वतीने जाब विचारण्यात येईल असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे. याबाबत पुढे बोलताना डॉ इंगोले यांनी अंबाजोगाई हे एक शैक्षणिक शाळा कॉलेजेस, पतसंस्था, व्यापारी बाजारपेठ तसेच वैद्यकीय दवाखाने या आस्थापनांनी समृद्ध असलेले शहर आहे. येथे सारस्वत, गुणवंत आणि बुद्धिवंत मंडळी राहतात गेल्या सहा महिन्यापासून वीज मंडळाच्या अनागोंदी कारभारामुळे सर्वसामान्य जनतेला नाहक त्रास होत आहे. गेल्या सहा महिन्यापासून वीज विभागाने हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात पावसाळ्याकरिता मेंटेनन्स ची कामे चालू आहेत असे सांगत वीज विभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी वारंवार लाईटी घालविल्या ,वीज पुरवठा खंडित केला आणि ही कामे झाल्याचा बनाव केला होता. परंतु सध्या पावसाळा सदृश्य चित्र आहे आणि आता आकाशामध्ये साधे ढग जरी आले तरी लाईट जात आहे पाऊस आला तरी लाईट जात आहे, साधं वारं आलं तरी लाईट जात आहे , विद्युत दाब कमीजास्त होत आहेत,मग विज मंडळाने मेंटेनन्सची कोणती कामे केली आहेत असा सवाल जनता विचारत आहे. अंबाजोगाईच्या आसपास असणाऱ्या अनेक शहरांमध्ये विद्युत पुरवठा हा सुरळीत आहे. परळी बीड, बार्शी उस्मानाबाद, कळंब यासारख्या ठिकाणी लाईट नियमित असते मात्र शांत असणाऱ्या, वेळोवेळी नियमितपणे विजेचे बिल भरणाऱ्या अंबाजोगाईकरांवर वारंवार लाईटी घालून वीज मंडळ अंबाजोगाई करांच्या संयमाची परीक्षा पाहत आहे का असा सवाल डॉक्टर इंगोले यांनी केला आहे, याबाबत वीज मंडळाच्या चीफ इंजिनियर व जबाबदार अधिकाऱ्यांशी सर्वपक्षीय भेट घेऊन लवकरच याप्रकरणी विज पुरवठा नियमित करणे बाबत वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तोडगा काढला नाही तर अंबाजोगाई करांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे डॉक्टर राजेश इंगोले यांनी सांगितले आहे.

# स्कार्पिओ गाडीचे टायर फुटल्याने डिव्हायडरवर आदळली

## रहदारीच्या ठिकाणी झाला अपघात; सुदैवाने जीवित हानी टळली

माजलगाव । प्रतिनिधी

भागवताच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी निघालेली स्कार्पिओचे टायर फुटल्याने डिव्हायडरवर जाऊन आदळुन अपघात झाल्याची दुर्दैवी घटना दि.२९ मे गुरुवार रोजी सकाळी ११:३० वाजण्याच्या दरम्यान माजलगाव शहरापासून जवळच केसापुरी वसाहत माजलगाव - गढी या राष्ट्रीय महामार्गावर घडली. गाडीचे पुढचे टायर फुटल्याने हा अपघात भर रहदारीच्या ठिकाणी झाला असून सुदैवाने अपघातात होणारी जीवित आणि टळली.

माजलगाव (देवखेडा) येथील धर्मानाथ अर्बनचे चेअरमन मुकुंद जोगडे यांची सदरील स्कारपीओ (गाडी नं.एम. एच.४४ झेड ५७५७) असल्याची



माहिती आहे.सुर्डी येथील भागवत कथेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास मुकुंद जोगडे यांच्या कुटुंबातील तीन व्यक्ती एक लहान मुलगा गाडीत प्रवास करत होता शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी वसाहत माजलगाव गढी या राष्ट्रीय महामार्गावर स्कारपीओ गाडीचे पुढचे टायर फुटल्याने स्कारपीओ गाडीने तीन पलट्या खात गाडी डिव्हाइडरवर जाऊन आदळली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितली.दरम्यान गाडीतील सर्व व्यक्तींना नागरिकांनी गाडीच्या बाहेर काढले व त्वरित जवळच्या खाजगी रुग्णालयात हलवले. अपघातातील व्यक्तींना किरकोळ मार लागला असून सर्वजण सुखरूप असल्याची माहिती संजिवनी हॉस्पिटलचे डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले यांनी दिली. केसापुरी वसाहत माजलगाव -गढी या राष्ट्रीय महामार्गावर सतत वाहनांची वाहतुक असते. त्याचप्रमाणे या परिसरात अनेक मंगल कार्यालये आहेत.मच्छी मार्केट,शाळा, महाविद्यालय, ग्रामीण पोलीस स्टेशन, आ.सोळंके यांचे निवासस्थान आहे.त्यामुळे हा भाग सतत रहदारीने गजबजलेला असतो.परंतु ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी सुदैवाने त्याठिकाणी कोणी नव्हते.त्यामुळे यावेळी होणारी मोठी जीवित हानी टळली आहे.

# बीड, जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या संचालकपदी सुनंदा मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक लि., अंबाजोगाईच्या अध्यक्षा श्रीमती. सुनंदा परशुरामजी मुंदडा यांची बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या स्विकृत संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. असोसिएशन्सचे अध्यक्ष स.छ. लोहिया यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे.

बीड येथे जिल्हा नागरी सहकारी बँक्स्? असोसिएशन लि., बीडच्या कार्यकारी मंडळ बैठकीत झालेल्या निर्णया नुसार, सुनंदा मुंदडा यांची बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स्? असोसिएशन लि., बीडच्या ''स्विकृत संचालक'' पदी नियुक्ती करण्यात आली.सुनंदा मुंदडा यांचे सहकार क्षेत्रातील कार्य व अनुभवाचे बीड जिल्हा नागरी




सहकारी बँक्स्? असोसिएशनच्या प्रगतीस मोलाचे योगदान लाभलेले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. सुनंदा मुंदडा यांनी सहकार क्षेत्रात काम करत असताना आपल्या स्वकर्तृत्वाने आर्थिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे.त्यांच्या या झालेल्या नियुक्ती बद्दल आ.नमिता अक्षय मुंदडा, जेष्ठनेते नंदकिशोर मुंदडा, वसुंधरा बँकेचे तज्ञ संचाालक ॲड.आर.डी.कदम, पुरुषोत्तम भन्साळी,यांच्या सह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# चोंडी या ठिकाणी होणाऱ्या ऐतिहासिक जयंतीचे साक्षीदार व्हा, डॉ, सिद्धार्थ रहींज

बीड । प्रतिनिधी

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे या दिवशी ३०० वी जयंती चौंडी या ठिकाणी मोठ्या उत्साहात जयंती साजरी होणार आहे , या चोंडी या ठिकाणी होणाऱ्या जयंती



निमित्त उपस्थित राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, लोकप्रतिनिधी आमदार हे उपस्थित राहणार आहेत या होणाऱ्या जयंतीनिमित्त राज्यातील समाज बांधवांनी खूप मोठ्या प्रमाणात या जयंतीनिमित्त उपस्थित राहावे असे आव्हान डॉ, सिद्धार्थ रहींज यांनी केले आहे

# वडवणीतील वेश्या व्यवसायावर पोलिसांची धाड; दोन भावांना बेड्या

## संघर्ष बिअरबार लॉजमध्ये सुरू होता वेश्याव्यवसाय

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील ताड सोन्ना रोडवर असलेल्या संघर्ष बिअर बार,लॉज मध्ये गेल्या काही दिवसापासून सर्रासपणे वेश्या व्यवसाय सुरू होता याची माहिती मिळताच पिंपळनेरच्या प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांनी सापळा रचत मंगळवारी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान कारवाई केली यामध्ये दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून संघर्ष बियर बार लॉज च्या मालक असलेल्या परमेश्वर सव्वाशे व रामेश्वर सव्वाशे राहणार लक्ष्मीपूर तालुका वडवणी या दोन भावांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. वडवणी शहरापासून काही अंतरावरच संघर्ष बिअर बार लॉज आहे येथे गेल्या अनेक दिवसापासून सुरू आहे जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील महिलांना येथे आणून त्यांच्याकडून व्यशा व्यवसाय करून घेतला जात होता.असे असताना देखील हप्ते खोरी मुळे वडवणी पोलीस यावर कुठलीच कारवाई करीत नव्हते. तसेच गेल्या एक वर्षापूर्वी याच लॉजवर अल्पवयीन शाळकरी मुलीला आरोपीने बळजबरीने आणून याच लॉजवर बलात्कार केला होता.तेव्हाही हा लॉज वादाच्या सापडला होता लॉज चालकांकडून कुठलीच कागदपत्र पुरावे न पाहता सर्रासपणे अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यासाठी लॉज उपलब्ध करून दिला जात होते.असे असतानाही वडवणी पोलिसांनी यावर कुठलीच कठोर कारवाई न केल्याने या लॉजवर पुन्हा वेश्या व्यवसाय सुरू करण्यात आला होता. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेरच्या उपाधीक्षक पूजा पवार पोलीस, निरीक्षक अर्जुन गोलवार, मुरली गंगावणे ,शिवाजी गंगावणे ,महेश गर्जे,अनिल मदने,रेश्मा गर्जे ,आदींनी केली आहे.

**वडवणी पोलीस करतात काय?**

वडवणी शहरासह ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू आहेत. बाहेरील पोलीस येऊन वडवणीत कारवाया करत असताना वडवणी पोलीस नेमके करतात तरी काय तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू आहेत गुटखा,वाळू,मटका,दारू, वेश्याव्यवसाय यासह अनेक अवैध धंदे तालुक्यात असताना वडवणी पोलीस हप्ते खोरी मुळे कारवाई करत नसल्याचे यावरून दिसत आहे.

### जनता दरबाराचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा -तहसीलदार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसील यांच्या वतीने सर्व जनतेचे कामे मार्गी लागण्यासाठी सोमवार व गुरुवार या दिवशी जनता दरबार तहसील कार्यालयाच्या च्या वतीने आयोजित केला आहे. पाटोदा येथील बैठक हॉलमध्ये आयोजित केला आहे सोमवार दिनांक २/ ६ /२०२५ रोजी ठीक वेळी दुपारी १२ ते ०२ वेळेत महसूल विषयी उपस्थित जनतेचे प्रश्न सामावून घेऊन त्याचे निराकरण करण्यात येणार आहे त्यामुळे तालुक्यातील सर्व जनतेस मी दत्तात्रय निरवाड तहसीलदार पाटोदा असे आव्हान करतो जनता दरबारामध्ये सर्वांनी आपल्या समस्याचे निराकरण करण्याकरिता नमूद वेळेवर उपस्थित राहावे असे तहसीलदार पाटोदा यांच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# केज येथे माळेगाव ते चौंडी पुण्यश्लोक अहिल्यादेवी रथयात्रेचे उत्साहात स्वागत

## अहिल्यादेवी होळकरांनी समतेचा विचार दिला -प्रा.डॉ.कुंभारगावे

**केज । प्रतिनिधी**

**गेल्या अनेक वर्षापासून नांदेड जिल्ह्यातील माळेगाव येथून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती रथामध्ये घेऊन पायी दिंडी ३१ मे पर्यंत चौंडी ला जात असते या वर्षी या दिंडीचे आगमन बुधवार रोजी दुपारी केज येथे झाले.**

केज शहरात नागरिकांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या रथाचे दर्शन घेऊन स्वागत केले .रथयात्रा दिंडीसाठी दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी ह भ प संभाजी महाराज धुळगंडे,प्रा डॉ मुरहरी कुंभारगावे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ कुंभारगावे म्हणाले अहिल्यादेवी होळकरांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत असे मत व्यक्त केले.अहिल्यादेवीचे विचार सर्वांच्या मनावर रुजले पाहिजेत असे मत ह भ प संभाजी महाराज धुळगंडे



यांनी व्यक्त केले. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचा विचाराचा जागर करत ही दिंडी अहिल्यादेवींचे चे जन्मस्थळ चौंडी येथे ३१ मे रोजी जयंती दिनी पोहोचणार आहे. महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी केज शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी दर्शना सह प्रबोधन कार्यक्रम घेण्यातआला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाळासाहेब गाढवे ,संजय रोडे, सिध्देश्वर गावडे , कृष्णा रोडे, अशोक रोडे,ओम चादर,राजेभाऊ डुकरे, शिवाजी चेपट ,तात्या रोडे, बबलू रोडे बालासाहेब गायके, जयदेव रोडे, पप्पू लांडगे,सुरज चादर ,बालाजी चादर,आबाराव लांडगे,मेघराज गावडे ,रुहिदास गावडे, सुखदेव लांडगे,शाहादेव सौदागर,डिंगाबर निगुळे, बालासाहेब, भुतकर, रामकिसन सौदागर,सतीष रोडे, प्रभावती अनंत चादर, पार्वती सतीष रोडे,केवळबाई वसंत सौदागर, पुष्पा बाई सुखदेव लांडगे,काशिबाई काशिनात रोडे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ हनुमंत सौदागर यांनी केले.दर्शन सोहळ्यास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसील कार्यालयात प्रत्येक सोमवार आणि गुरुवारी जनता दरबार आयोजित करण्याचे निर्देश जारी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न समजावून घेऊन त्यावर वेळीच मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार मंगळवार आणि गुरुवार या दिवशी जनता दरबार आयोजित करण्यात येत आहे. यातील बहुसंख्य प्रश्न उपविभाग आणि तालुकास्तरावर सुटण्यासारखे आहेत यामुळे आगामी काळात उपविभाग आणि तालुकास्तरावर जनता दरबार आयोजित करण्यात यावे असे परिपत्रक जिल्हाधिकारी बीड यांच्यातर्फे जारी करण्यात आले आहे.

लोकांचे प्रश्न समजावून घेऊन वेळेवर सोडवणूक करण्यासाठी शासनाने अभ्यागतांसाठी वेळ राखून ठेवण्याचे निर्देश १५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयाद्वारे जारी केलेले आहेत त्यानुसार जिल्हास्तरावर आठवड्यातून तीन दिवस जनता दरबारचे आयोजन करण्यात येत आहे.

उपविभाग आणि तालुकास्तरावर जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक होत नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित होत असलेल्या या जनता दरबारात मोठी गर्दी होत आहे, या पार्श्वभूमीवर हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

तालुकास्तरावर या पुढील काळात प्रत्येक तहसील कार्यालयात सोमवार आणि गुरुवार या आठवड्यातील दोन दिवस जनता दरबाराचे आयोजन करण्याचे या परिपत्रकात निर्देशित करण्यात आले आहे.

सर्व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागातील एका तालुक्यात त्यांच्या सोयीनुसार या जनता दरबारात उपस्थित राहावे असेही या परिपत्रकात म्हटले आहे. प्रत्येक सोमवार आणि गुरुवार हा जनता दरबार होईल, यात दुपारी १२ ते २ या वेळेस जनतेचे प्रश्न समजून घेऊन त्याचे निराकरण करावे तसेच या दिवशी संबंधित अधिकाऱ्याने दौरा अथवा बैठकीचे आयोजन करू नये असे या परिपत्रकात म्हटले असून जनता दरबार मध्ये भेट दिलेल्या अभ्यागतांची संख्या आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर महिन्याच्या पाच तारखेला मासिक दैनंदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा असेही निर्देशित करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एनडीए ने रचला इतिहास! ७५ वर्षांनी प्रथमच १७ मुली अधिकारी म्हणून सैन्यदलात दाखल

## मुलांच्या बरोबरीने मुलींनीही घेतले तीन वर्षे खडतर प्रशिक्षण

## मुलगी अधिकारी झाल्याचे पाहुन आई-वडीलांचे डोळे पाणावले

## गुरुवारी झाला १४८ वा पदवीप्रदान सामारंभ

## उद्या होणार ऐतिहासिक पासिंग आऊट परेड

पुणे : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनी (एनडीए) संस्थेने गुरुवारी आगळा वेगळा इतिहास रचला. संस्थेच्या स्थापने पासून पंचाहात्तर वर्षात प्रथमच मुलींना सैन्यदलात अधिकारी होण्याची संधी देण्यात आली त्या संधीचे सोने करीत तीन वर्षांच्या खडतर प्रशिक्षणानंतर देशाच्या विविध प्रांतातून आलेल्या १७ मुलींना पदवी प्रदान करण्यात आली.आता त्या लष्कर,नौदल आणि हवाईदलात थेट अधिकारी पदावर नियुक्त होणार आहेत.आपल्या मुलींचे कौतुक पाहण्यासाठी देशाच्या कानाकोपर्यातून त्यांचे आई-वडील आले होते.

एनडीएची स्थापना पुण्यातील खडकवासला भागात ८ जून १९४९ रोजी सुमारे ७५ वर्षापूर्वी झाली.कारण एकाच ठिकाणी लष्कर,नौदल आणि हवाईदलाचे अधिकारी तयार करता यावेत हा उद्देश होता.मात्र या संस्थेच २०२१ पर्यंत मुलींना प्रवेश नव्हता.कारण तशी तरतूद नव्हती.मात्र सरकारने २०२२ मध्ये मुलींना येथे प्रवेश दिला.त्या पहिल्या तुकडीत देशभरातून १७ मुलींची निवड झाली.त्याचे कौतुक करण्यासाठी त्या वर्षी राष्ट्रपती दौपदी मुर्मू आल्या होत्या.त्या सर्वमुली तीन वर्षांचे खडतर परिश्रम पूर्ण करीत आज देशाच्या सैन्यदलात अधिकारी पदावर रुज होण्यास सज्ज झाल्या.

मुलींनी इतिहास रचला : कुलगुरु डॉ.पूनम टंडन

या पदवीप्रदान सोहळ्यासाठी दिनदयाल उपाध्याय, गोरखपर विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा.डॉ.पूनम टंडन आल्या होत्या.त्या भौतिकशास्त्राच्या संशोधक आहेत. त्या म्हणाल्या ,आज ३०० पेक्षा जास्त कॅडेटसनी या ठिकाणी पदवी घेऊन सैन्यदलात प्रवेश केला आहे.मात्र जास्त कौतुक वाटते ते १७ मुलींचे ज्यांनी अथक परिश्रम घेत सैन्यदलातील अधिकारी म्हणून रुजू होण्याचा मान मिळवला.या मुलींनी इतिहास रचला आहे कारण एनडीए संस्थेतून अधिकारी म्हणून बाहेर पडणारी ही पहिलीच तुकडी आहे.त्यांनी देशातील लाखो मुलींच्या मनात नवी आशा,उर्जा आणि जिज्ञासा निर्माण केली मी त्यांनी सॅलूट करते.



### ३३९ विद्यार्थांना पदवी प्रदान..

गुरुवारी एनडीएचा १४८ वा पदवी प्रदान सोहला पार पडला यात सुमारे ३३९ कॅडेटस ना पदवी प्रदान करण्यात आली.यात बीए.बीएस्सी आणि बि.टेक.या पदवीचा समावेश आहे.यात प्रथमच १७ मुलींनी ना पदवी प्रदान करण्यात आली.

### चार जणांना मिळाले रौप्य पदक..

गुरुवारी चार कॅडेटस ना रोप्यपदक देण्यात आले यात मुलींमधील पहिल्या रौप्य पदाकीची मानकरी क्षीती दक्ष,लकी कुमार ,प्रीन्सकुमार कुशवाह,उदयसिंग नेगी यांना कुलगुरु डॉ.पूनम टंडन यांनी पदवीसह रौप्यपदक अणि ट्रॉफी प्रदान केली.

# मुसळधार पावसाचा शेतीपिकांना फटका; कांदा-टोमॅटोच्या दरावर मोठा परिणाम



**पुणे । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात झालेल्या पावसाचा परिणाम पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घाऊक बाजारात जाणवला. कांदा आणि टोमॅटोची आवक घटली आहे. पावसामुळे प्रत खराब झाल्याने त्यांच्या भावांत घट झाली असून, चांगल्या प्रतिच्या मालाची कमतरता आहे. त्याला भाव मिळू लागल्याचे दिसून येत आहे.**

पुणे जिल्ह्यात जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूरसह अहिल्यानगर येथील पारनेर, संगमनेर तालुक्यांमध्ये उन्हाळी टोमॅटोची मोठी लागवड होत असते. तसेच कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर पुणे जिल्ह्यात घेतले जाते. मात्र, यावर्षी मे महिन्यातच ऐन काढणीच्या अवस्थेतच गेली १५ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे टोमॅटोच्या शेतात पाणी साठून राहिल्याने मूळकुज सुरू झाली आणि पिकांची वाढ खुंटली आहे. तर टोमॅटोला क्रॅक जाऊ लागले. झाडांवर करप्याचा प्रादुर्भाव झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

सध्या टोमॅटोला २० किलोच्या क्रेटला ५०० ते ६०० रुपये दर मिळत होते. मात्र, आता भिजलेल्या आणि क्रॅक झालेल्या टोमॅटोचे दर १०० ते ३०० रुपयांवर आले आहेत. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीसह जिल्ह्यातील इतर बाजार समिती आणि उपबाजारातील टोमेटोची आवक घटली आहे. पाऊस सुरु राहिला तर नुकसानीचा आकडा वाढू शकतो.

दरम्यान, उन्हाळी कांद्याच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला कांदा भिजला आहे. तसेच सुरक्षित ठिकाणी ठेवलेल्या कांद्याची वाहतूक शेतातील चिखलामुळे करता येत नाही. यामुळे कांद्याची बाजारातील आवक कमी झाल्याचे व्यापारी रितेश पोमण यांनी सांगितले.

तर पुढील काळात आवक वाढून भाव होतील पूर्ववत

दोन-तीन दिवसांपूर्वी बाजारात ४० ते ५० ट्रक इतकी कांद्याची आवक होत होती. परंतु, आता ती २० ते २५ ट्रक इतकीच होत आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे घाऊक बाजारात कांद्याच्या भावांत प्रति किलो मागे दोन रुपयांनी वाढ झाली. पावसाने विश्रांती घेतली तर पुढील काळात आवक वाढून भाव पूर्ववत होतील असे पोमण यांनी नमूद केले.

# प्रश्नोत्तरांवरील आक्षेपासाठी ३० मे पर्यंत मुदत; एलएलबी ३ वर्षे प्रवेश परीक्षा

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी) एलएलबी ३ वर्षे प्रवेश पूर्व परीक्षेतील (सीईटी) प्रश्न आणि उत्तरांवर आक्षेप नोंदवण्यासाठी ऑब्जेक्शन ट्रॅकर विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यानुसार उमेदवारांना २८ ते ३० मे या कालावधीत आपले आक्षेप नोंदवता येणार आहेत.

शैक्षणिक वर्षे २०२५-२६ साठी घेण्यात आलेल्या एलएलबी ३ वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेश पूर्वपरीक्षेतील उत्तरांवर आक्षेप नोंदविण्यासाठी उमेदवारांना सीईटी सेलचे अधिकृत संकेतस्थळ cetcell.mahacet.org वर जाऊन हरकती नोंदवता येणार आहेत. ३० मे नंतर ऑब्जेक्शन ट्रॅकर बंद केला जाणार असल्याचे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे.


उमेदवारांना प्रति प्रश्न, प्रति आक्षेपासाठी लॉगिनद्वारे ऑनलाइन पद्धतीने एक हजार रुपये शुल्क भरावे लागतील. आक्षेपावर तज्ज्ञ व्यक्तींचे अभिप्राय मागवून ते अंतिम मानले जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे

# पावसाळ्यापूर्वी ५ लाखांपेक्षा जास्त प्राण्यांचे लसीकरण पूर्ण; जिल्हा परिषदेचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

पावसाळ्यापूर्वी संसर्गजन्य आजारांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पुणे जिल्ह्यात व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम १५ जूनपर्यंत राबविण्यात येणार असून आतापर्यंत जिल्ह्यात ५,७०,७९१ जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. पावसाळ्यात डास, फर्या (ब्लॅक क्वार्टर - बीक्यू ), एन्टरोटॉक्सिमिया आणि लम्पी स्किन डिसीज (एलएसडी) सारख्या आजारांपासून जनावरांचे संरक्षण करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या आजारांचा संसर्ग रोखण्यासाठी आणि पावसाळ्यात जनावरांच्या मृत्युदर कमी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने विशेष प्रयत्न केले आहेत. मोहिमेअंतर्गत मिळालेल्या ५,९७,२०० लसींचा साठा गावपातळीवर वितरित करण्यात आला आहे. मान्सूनपूर्व लसीकरणात ३,४७,३९६ गायी, ३६,८०८ म्हशी आणि २८,०७४ वासरांचे लसीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यात १५ मे पर्यंत लम्पी स्किन डिसीजचे लसीकरण पूर्ण झाले असून इतर संसर्गजन्य आजारांसाठी मोहीम सुरू असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विष्णु गर्जे ह्यांनी दिली.



जनावरे कोणत्या आजारांना बळी पडतात?

पावसाळ्यात जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. त्यात मुख्तय फर्या (ब्लॅक क्वार्टर - बीक्यू): हा एक गंभीर आजार आहे ज्यावर वेळेवर उपचार न केल्यास जनावरांचा मृत्यू होऊ शकतो. पुणे जिल्ह्यात गायींना या आजारापासून वाचवण्यासाठी बीक्यू लस दिली जात आहे. आतापर्यंत २५,१६२ बीक्यू डोस देण्यात आले आहेत.


घटसर्प (हेमोरेजिक सेप्टीसीमिया - एचएस): या आजारात मृत्युदर बराच जास्त आहे. विशेष लसीकरण मोहिमेत गायी आणि म्हशींना एचएस लस दिली जात आहे. आतापर्यंत १,३८,०९६ घटसर्प च्या लसी देण्यात आल्या आहेत. घट्टसर्प स्किन डिसीज (एलएसडी) हा आजार पावसात वेगाने पसरतो आणि वेळेवर उपाययोजना न केल्यास जनावरांचा मृत्यू होऊ शकतो. अंत्रविषार (एन्टरोटॉक्सिमिया): या आजारासाठी प्राण्यांनाही लसीकरण केले जात आहे, त्यापैकी १,८३,४४८ डोस देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व सरकारी पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये मान्सूनपूर्व उपाययोजने अंतर्गत पाळीव प्राण्यांना लसीकरण केले जात आहे. संसर्गजन्य रोगांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी, शेतकरी आणि पशुपालकांनी त्यांच्या जवळच्या पशुवैद्यकीय रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्राण्यांना लसीकरण करून घ्यावे.

- डॉ. विष्णू गर्जे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,

# रिक्षावर झाड कोसळल्याने ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात बुधवारी (दि.२८) दुपारी झालेल्या मुसळधार पावसात झाड कोसळल्याने रिक्षात प्रवास करणाऱ्या ७६ वर्षीय ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पेशवे पार्क उद्यानाजवळ घडली. यात रिक्षाचालक जखमी झाला आहे. याप्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. शुभदा यशवंत सप्रे (वय ७६, रा. सिंहगड रोड) असे मृत महिलेचे नाव आहे. रिक्षाचालक संजय अवचरे हे जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली.



पोलिसांनी दिलेली माहिती अशी की. ना. सी. फडके चौकातून सिंहगड रस्त्याच्या दिशेने निघालेली रिक्षा पेशवे पार्क उद्यानाजवळ पोहोचताच अचानक उद्यानातील एक जुने गुलमोहराचे झाड मोडून रस्त्यावर कोसळले. या झाडाचा मोठा फांदीचा भाग थेट रिक्षावर पडला. अपघात इतका भीषण होता की रिक्षाच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. त्यात रिक्षाचालक आणि महिला प्रवासी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमींना मदत केली. शुभदा सप्रे यांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. रिक्षाचालक संजय अवचरे यांच्यावर उपचार सुरू आहेत.

जबाबदारी कोण घेणार?


या घटनेनंतर पुन्हा एकदा महापालिकेच्या वृक्ष छाटणी आणि देखभाल विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पावसाळ्यापूर्वी झाडांची तपासणी, छाटणी व नाजूक झाडांची विल्हेवाट लावणे आवश्यक असते. मात्र, वेळेवर उपाययोजना न केल्यामुळे निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

# सावरकरांना अभिवादन करण्यासाठी फर्गसनमध्ये गर्दी

पुणे । प्रतिनिधी

सावरकरांचे वास्तव्य असलेली फर्गसन महाविद्यालयातील ऐतिहासिक खोली क्रमांक १७ पाहण्यासाठी नागरिकांनी बुधवारी मोठी गर्दी केली होती.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना फर्गसनमध्ये अभिवादन करण्यात आले. यावेळी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ड. अशोक पलांडे, कार्यवाह डॉ. आनंद काटीकर, फर्गसनचे प्राचार्य श्याम मुडे आणि उपप्राचार्य प्रा. स्वाती जोगळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सावरकरांच्या



अर्धपुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सावरकरांचे वास्तव्य असलेली फर्गसनमधील खोली क्रमांक १७ नागरिकांसाठी खुली ठेवण्यात आली होती. १९०२ ते १९०५ या काळात विद्यार्थीदशेत सावरकर येथे राहत होते. या खोलीतूनच 'अभिनव भारत' सारख्या संघटनेची पायाभरणी, स्वदेशी चळवळीची सुरुवात, विदेशी वस्त्रांची होळी यांसारख्या क्रांतिकारी उपक्रमांची आखणी करण्यात आली.

येथेच त्यांनी 'सिंहगडाचा पोवाडा', 'बाजीप्रभू देशपांडे' यांसारखी काव्यरचना केली. या खोलीत सावरकरांचा अर्धपुतळा, डी.लिट. पदवीचे गणवेश, वैयक्तिक वस्तू आणि दुर्मीळ छायाचित्रांचे संग्रह पाहायला मिळतो. ही खोली आजही अनेकांना देशभक्तीची प्रेरणा देणारे ठिकाण म्हणून ओळखली जाते.

१९०५ साली विदेशी वस्त्रांची होळी प्रकरणामुळे त्यावेळचे प्राचार्य रँग्लर परांजपे यांनी सावरकरांना वसतिगृहातून वगळले होते. त्यावर लोकमान्य टिळकांनी 'केसरी'मधून जोरदार निषेध केला होता. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने या खोलीचे जतन केले असून दरवर्षी सावरकर यांच्या जयंती आणि पुण्यतिथीला ही खोली सर्वांसाठी खुली केली जाते.

# काळजी करू नका...! ज्यांचा घरात पाणी गेलं त्यांना १० हजार देणार; अजित पवारांची मोठी घोषणा

पुणे । प्रतिनिधी

मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून, घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मोठी घोषणा करत, ज्यांच्या घरात पावसाचं पाणी शिरलं आहे, त्यांना १० हजार रुपयांची तातडीची मदत दिली जाईल, असं स्पष्ट केलं आहे.

अजित पवारांनी आज बारामती तालुक्यातील सिद्धेश्वर निंबुडी गावातील पावसाने बाधित झालेल्या भागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी कोसळलेली घरे, वाहून गेलेले रस्ते, वीज खांब यासारख्या नुकसानीच्या ठिकाणांना भेट देत गावकऱ्यांशी संवाद साधला आणि प्रशासनाला तातडीने पंचनामे करून मदतीचे आदेश दिले. पंचनामे सुरू आहेत. घरात पाणी शिरलेल्यांना १०



हजार रुपये देतो. लवकरच पैसे वर्ग करण्यात येतील, अशी दिलासादायक घोषणा त्यांनी केली.

दरम्यान, नुकसानग्रस्तांची यादी लवकरच प्रशासनाकडून अंतिम करण्यात येणार आहे.

बारामतीत नुकतेच निरा कालव्याला तडे गेल्यामुळे अनेक गावांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. ही आर्थिक मदत कित्येक कुटुंबांसाठी दिलासा ठरणार असल्याने, राज्य सरकारच्या या पावसाळी मदतीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

काय म्हणाले अजित पवार?

गावातील नुकसानीचे पंचनामे उरकले का, धान्य द्यायला सुरुवात केली आहे. आता, ज्यांच्या ज्यांच्या घरात पावसाने पाणी गेलंय, त्यांना १०-१० हजार रुपये देतोय. लवकरच त्यांना पैसे सोडायला लावतो, काळजी करू नका, असं म्हणत अजित पवारांनी पावसामुळे नुकसान झालेल्या कुटुंबीयांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

# भाजप आमदाराच्या घरात घुसण्याचा प्रयत्न; शिवीगाळ करत मारहाणीची धमकी, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे खडकवासलाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या घरात एका मद्यपीने शिरण्याचा प्रयत्न केला. सुरक्षेसाठी असलेल्या पोलिसांनी त्याला अडवताच त्याने शिवीगाळ करत गोंधळ घातला. ही घटना बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली.

याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी शंकर सर्जेराव धुमाळ(४७) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर सरकारी कामात



अडथळा, सार्वजनीक ठिकाणी शिवीगाळ, घरात घुसण्याचा प्रयत्न आदी चार कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलीस कर्मचारी अजित देवघरे यांनी तक्रार दिली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड यांनी सांगितले की, रात्री आरोपी मद्यपान करुन आमदाराच्या घरापाशी आला. तेथील सुरक्षेसाठी तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. त्यांना धक्काबुक्की करत घरात घुसण्याचा प्रयत्न केला.

सुरक्षा रक्षकांनी तातडीने पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला. पोलिसांनी त्याला अटक केली. चौकशीत तो सध्या पुण्यात एकटाच रहातो. त्याचा पुर्वी काचेचे ग्लास विक्रीचा व्यवसाय होता तसेच गावाकडे शेती आहे. दरम्यान वर्षभरापुर्वीही त्याने अशाच प्रकारे सुरक्षा कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याचे उघड झाले आहे.

# पुण्यातील 'या' ठिकाणच्या अतिक्रमणप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करा; बावनकुळेंचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

विधान मंडळ अधिवेशनादरम्यान लक्षवेधीवरील माहिती नुसार पुणे शहरातील कात्रज ,कोंढवा, येवलेवाडी या तीन ठिकाणांच्या अतिक्रमण प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करावेत. यासाठी पुणे महानगरपालिका व महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.



मंत्रालयात लक्षवेधीवरील कार्यवाहीच्या अनुषंगाने मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आमदार योगेश टिळेकर तसेच सहसचिव सत्यनारायण बजाज, सहसचिव अजित देशमुख उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, विधिमंडळ अधिवेशनातील लक्षवेधीवरील सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची लवकरच प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणार आहे.

महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवरील बैठका

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांवरील बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या संबंधित बैठकांना राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, आमदार प्रकाश सोळंके, आमदार प्रवीण दरेकर, अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सहसचिव अजित देशमुख उपस्थित होते. भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे दूरदृष्यप्रणालीद्वारे पुणे महानगरपालिकेचे व पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. मंत्रालयात सहभागी झाले होते. या बैठकीमध्ये मोबाईल टॉवर साठीच्या जागांचे भाडेपट्टा करारातील नोंदणीच्या अडचणीबाबत चर्चा झाली. परतवाडा जि. अमरावती नगरपरिषद हद्दीतील जमिनीस वाणिज्यिक वापरासाठी परवानगीबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. भूसंपादन कायद्यात केंद्र सरकारने बदल केला आहे, या अनुषंगाने राज्यातील अंमलबजावणीसाठी आणि जमिनीचे वर्ग रूपांतर करण्याबाबत धोरणात्मक निर्णय होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना करण्यात आली.